CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ३५ | सोमवार दि. २३ ऑगस्ट २०२१ ते रविवार दि. २९ ऑगस्ट २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले बाईनेच भोंदुबाबाला पकडून दिले

मुंबई/राजेंद्र वेदांते



संकटात सापडलेला माणूसच अंधश्रद्धेच्या आहारी जातो. कारण ज्या गोष्टी त्याला प्रयत्न करूनही मिळत नाहीत. त्या ईश्वरी कृपेने किंवा जादूटोणा करून मिळू शकतात असे जेंव्हा माणसाला वाटू लागते तेंव्हा अशा अडचणीत सापडलेल्या माणसाला भोंदू बाबांचे दलाल गाठतात आणि मग भोंदू बाबा अशा जाळ्यात सापडलेल्या सावजाचे आर्थिक शोषण करू लागतो ...पान २ वर

# मित्राच्या मुलाचा त्याने 'नरबळी' दिला मुल होत नसल्याने विश्वास घात केला







कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**शाहू, फुले, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र हा वैचारिक दृष्ट्या अत्यंत प्रगल्भ समजला जातो. कारण येथे ज्ञानोबा, तुकोबा यांच्या सारख्या संत महात्म्यांपासून ज्योतिबा फुले यांच्या सारख्या समाज सुधारकांपर्यंत अनेकांनी अनिष्ठ प्रथा परंपरांच्या विरुद्ध आवाज उठवून समाजाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न केला. तर श्याम मानव, नरेंद्र दाभोलकर यांच्या सारख्या लोकांनी आयुष्यभर अंधश्राध्ये विरुद्ध लढा देताना प्राणाचे बलिदान देऊन सरकारला जादूटोणा विरोधी कायदा करायला भाग पाडले. मात्र या कायद्याची अंमलबजावणीच व्यवस्थित होत नसल्याने आजही समाजातील अंधश्रद्धा संपलेली नाही आणि याच अंधश्रद्धेतून धनप्राप्ती पुत्रप्राप्ती यासाठी नरबळी दिले जात आहेत. आज देशाने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केलेय. विज्ञानाच्या माध्यमातून देशाचा विकास सुरु आहे तरी सुद्धा महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात नरबळी दिले जात आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील सावर्डे बुद्रुक या गावात एका इसमाच्या लग्नाला १५ वर्ष झाली तरी मुल होत नसल्याने त्याने एका भोंदू बाबाच्या सांगण्यावरून आपल्या मित्राच्याच ७ वर्षाच्या मुलाचा नरबळी दिला. या प्रकरणी पोलिसांनी या विश्वासघातकी मित्राला अटक केली आहे.**



मुरगुड जवळील सोनाळी येथ रवींद्र पाटील हे आपल्या कुंटूंबासह राहयला आहेत. त्यांना सात वर्षाचा मुलगा वरद हा मुलगा असून तो इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकत आहे.रवींद्र पाटील याचा दत्तात्रय ऊर्फ मारूती वैद्य हा जवळचा मित्र असून त्याच्या लग्नाला जवळपास १५ वर्ष झाली तरी त्याला अद्याप मुलबाळ झाले नव्हते.मारूती वैद्य याने आपल्याला मुलबाळ व्हावे म्हणून बरेच औषध उपचार डॉक्टर केलेत परंतू त्यात त्याला यश आले नाही. शेवटी ते दोघे पती पत्नी आपल्याला मुलबाळ व्हावे म्हणून एकाच्या सांगण्यावरून मुरगुड परिसरातील एका महाराजाकडे गेले.तो महाराज देवाचा मोठा भक्त असल्याने त्याच्या दरबारात आजूबाजुच्या परिसरातील बरेच लोक आपल्या समस्या घेऊन येत होते.त्या समस्याचे तो आपल्या परीने निराकरण करीत होता. त्यात त्याच्याकडे येणाऱ्या लोकांचे ही समाधान होत असल्याने त्याच्या दरबारात लोकांची हजेरी वाढू लागली होती.

आपल्याला मुल होत नसल्याच्या कारणाने मारूती वैद्य हा ही त्या महाराजाकडे पत्नीसह गेल्या दीड दोन वर्षापासून जात होता.तो महाराज सांगेल तो उपाय ते दोघे पती पत्नी करीत होते.त्या महाराजाने त्यांना मुलबाळ होणेसाठी एक अघोरी प्रकार करायला सांगितला. वैद्य पती पत्नीला मूल हवे असल्याने त्या महाराजाने सागितलेले करायला ते तयार झाले होते. हा अघोरी प्रकार करीत असताना हा कुणाच्या लक्षात आणि कुणाला समजू नये याची दक्षता घेणेस त्या महाराजाने त्यांना सांगितले होते. त्यामुळे वैद्य याने आपण जे कृत्य करणार आहे ते कुणाला म्हणजे अगदी जवळचा मित्र रवींद्र पाटील याला देखील सांगितले नव्हते. त्या महाराजाने त्याना मुलबाळ होत नसल्याने नरबळी करण्यास सांगितले होते.त्या नरबळीसाठी एका लहान मुलाचा बळी देणेस सांगितल्याने ...पान २ वर

## ग्राहक बनून दोघेजण दुकानात आले ज्वेलर्सची हत्या करून फरार झाले





नालासोपारा/क्राईम रिपोर्टर

**गुन्हेगारांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नालासोपारा शहरात सतत चोरी, लुटमार, खून, दरोडे यासारख्या घटना घडत असतात. कारण इथल्या गुन्हेगारांना पोलिसांचा आणि कायद्याचा धाकच राहिलेला नाही. त्यामुळे रोज इथे काहीना काही गुन्हे घडत असतात. काल दिवसाधवळ्या दोन अज्ञात लुटारूंनी साक्षी ज्वेलर्स या दुकानात घुसून दुकान मालकाची निर्घुण हत्या केली. या घटनेमुळे नालासोपारा मधील व्यापारी वर्गात भीती आणि चिंतेचे वातावरण पसरले असून या घटनेच्या निषेधार्थ काल व्यापाऱ्यांनी बंद पाळला होता.**



नालासोपारा पश्चिम स्टेशन रोड जवळील साक्षी ज्वेलर्स नावाचे एक ज्वेलर्सचे दुकान आहे. काल सकाळी ११ वाजता या दुकानात दोन इसम ग्राहक बनून आले. यावेळी दुकानात फक्त दुकानाचे मालक किशोर जैन हेच्च होते, ते पूजा करायला आतल्या खोलीत जाताच ग्राहक बनून आलेल्या लुटारूंनी लुटमार करायला सुरुवात केली. तसे किशोर जैन बाहेर आले. मात्र लुटारूंनी त्यांना खुर्चीला बांधून त्यांच्या डोक्यात कैचीने वार केले आणि पळून गेले. दरम्यान जखमी किशोर जैन यांना आजूबाजूच्या लोकांनी अलायन्स रुग्णालयात नेले असता तिथल्या डॉक्टरांनी जैन यांना मृत घोषित केले. या घटनेने नालासोपारा येथे खळबळ माजली आहे. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्वतः मीरा-भाईंदर वसई-विरार विभागाचे पोलीस आयुक्त सदानंद दाते यांनी घटनास्थळी भेट देऊन तिथली पाहणी आणि चौकशी केली. तसेच पोलीस अधिकाऱ्यांना तपासाबाबत सूचना केल्या. या प्रकरणी नालासोपारा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## संपादकीय

### कोरोनाचा जनआशिर्वाद!

या देशात कायदे आणि नियम केले जातात, पण ते जनतेसाठी असतात. नेत्यांना मात्र ते लागू होत नाहीत. त्यामुळे रस्त्यावर उतरलेल्या नेत्यांच्या मागे कितीही गर्दी होवो त्यांना सोशल डिस्टन्सिंगचा नियम लागू होत नाही. कारण त्यांच्या भोवती जमलेल्या गर्दीतून कोरोना पसरण्याचा अजिबात धोका नसतो. कोरोनाचा धोका फक्त लोकल ट्रेन आणि मार्केट किंवा मंदिरातील गर्दीतून अधिक असतो. त्यामुळे कोरोनाचे जे काही नियम किंवा नवा निर्बंध आहेत ते फक्त लोकांनी पाळायचे आहेत नेते मंडळींनी नाही! काही दिवसांपूर्वी कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी होऊन नद्यांना महापूर आला. तर काही ठिकाणी भुसंखलन होऊन प्राणहानी झाली या दुर्घटनांची नंतर पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, राज्यपाल आदी सर्व मोठे मोठे नेते लोक दुर्घटनाग्रस्त भागात गेले होते आणि त्यांच्या सोबत सरकारी अधिकारी, पोलीस आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचा प्रचंड जमाव होता. काही ठिकाणी तर गर्दीत रेटारेटी झाली. त्यावेळी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री किंवा राज्यपालांना कोरोनांच्या नियमांची आठवण झाली नाही किंवा सोशल डिस्टन्सिंग पाळण्याची आवश्यकता वाटली नाही. पण लोकल ट्रेन मध्ये होणारी गर्दी हाच या महा पुरुषांच्या चिंतेचा विषय बनलेला आहे. सत्ताधाऱ्यांनी जर सार्वजनिक ठिकाणी गर्दी केली तर विरोधी पक्षाने तरी का मागे राहावे म्हणून आता भाजपच्या नव नियुक्त केंद्रीय मंत्र्यांनी महाराष्ट्रात जन आशीर्वाद यात्रा सुरू केली आहे. मंत्रिपद मिळून चार दिवस नाही झाले तोच जनतेचा आशीर्वाद घ्यायला निघाले आणि तेही कोरोनाच्या संकटकाळात! आता काय म्हणावे या लोकांना? मंत्री म्हणून अगोदर चांगले काम करा मोदींनी जी तुमच्यावर जबाबदारी सोपवलेली आहे ती अगोदर व्यवस्थित पार पाडा आणि नंतरच जनतेचे आशीर्वाद घ्यायला रस्त्यावर उतरा, तसे केले असते तर लोकांनाही बरं वाटल असतं. आणि लोकांनी मनापासून आशीर्वाद सुद्धा दिले असते. पण अजून कामाचा नाय ठिकाणा तरी सुद्धा आशीर्वादाची घाई कशाला? आज लोक कुठल्या परिस्थितीत आहेत. लोकांचे किती आणि कसे हाल सुरू आहेत ते तरी बघा! लॉकडाऊनच्या काळात उद्योगधंदे बंद पडल्याने अनेकांच्या नोकऱ्या गेल्यात, लोक कर्जबाजारी झालेत, त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. आणि अशा लोकांकडे आशीर्वाद मागायला आलात. लोकं खरोखरच आज पुढाऱ्यांना आणि मंत्र्यांना आशीर्वाद देण्याच्या मनस्थितीत आहेत का याचा जराही विचार नाही? मुख्यमंत्री आणि त्यांचे महान सल्लागार असलेले टास्क फोर्सचे डॉक्टर सांगत आहेत की एक कोरोना बाधीत चारशे लोकांना कोरोना बाधीत करू शकतो आणि हे जर खरे असेल तर जन आशीर्वाद यात्रेतील गर्दी मुळे किती लोक कोरोना बाधीत होतील याची कल्पना सुद्धा करवत नाही. आणि हे ठाऊक असतानाही जन आशीर्वाद यात्रेचा कशासाठी खटाटोप? आश्चर्याची गोष्ट अशी की सोशल डिस्टन्सिंग पाळण्याचे आवाहन करणारे भाजप नेते जन आशीर्वाद यात्रे सारख्या गर्दीचे आयोजक आहेत. आता काय म्हणावे या लोकांना? म्हणजे कामा धंद्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या लोकांनी लोकल ट्रेन मध्ये गर्दी केली किंवा जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी लोक घराबाहेर पडले, बाजारात गेले की त्यांच्यामुळे कोरोना पसरतो, पण पुढाऱ्यांचे दौरे, यात्रा, मेळावे, दुर्घटना ग्रस्त भागांना दिल्या जाणाऱ्या भेटीगाठी आणि तिथे होणारी गर्दी यामुळे कोरोना पसरणार नाही का? म्हणजे जबाबदारी फक्त लोकांनीच पाळावी पुढाऱ्यांनी नाही असा जो काही इथे प्रकार सुरू आहे तो दुटप्पी असल्याने संतापजनक आहे. अगोदर सरकार, विरोधी पक्ष प्रशासनातील अधिकारी यांनी कोरोनाचे नियम पाळावेत आणि नंतरच जनतेला उपदेश करावेत. कारण या देशात गरीब असो की श्रीमंत,सामान्य माणूस असो की मुख्यमंत्री कायदा सगळ्यांसाठी सारखा आहे असे असताना फक्त जनतेवरच कठोर निर्बंध का याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यावे.

## उसन्या पैशावरून त्यांच्यात वाद झाला एक हजार रुपयांसाठी त्याचा जीव गेला


लातूर/अमर करकरे



**आजकाल पैशाचे व्यवहार घातक ठरत आहेत. कारण उसनवारीचे पैसे वेळेवर मिळाले नाहीत तर पैसे देणार आणि घेणार यांच्यात मोठे वाद होऊन त्यातून एखाद्याचा जीव सुधा जाऊ शकतो. खास करून जो गुन्हेगारी प्रवृत्तीचा माणूस असतो. त्याच्याकडून तर कधीच कुणी उसने पैसे घेऊ नयेत आणि घेतले तर वेळेवर द्यावेत अन्यथा उसने पैसे घेणाऱ्याचे काही खरे नाही. मात्र लातूरमध्ये उलटेच घडले. अवघ्या एक हजार रुपयांसाठी उसने पैसे घेणाऱ्याचे उसने पैसे देणाऱ्याची हत्या केली. कारण काही दिवसांपूर्वी त्याला उसने पैसे देणाऱ्यांने मारहाण केली होती. त्याचा राग मनात ठेऊन त्याने पैसे देणाऱ्यालाच संपवले. या प्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**



१० ऑगस्ट २०१९ रोजी लातूर शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील सतगुरू नगर परिसरातील एका मंदिरात शेजारी भर रस्त्यावर एक ३५ वर्षीय तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्यात येऊन धडकली. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार पुजारी, एपीआय संजय पवार, पीएसआय मारुती मेतलवाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल तुकाराम माने यांच्यासह डीबी पथकाने घटनास्थळाकडे धाव घेतली. दादाजी कोंडदेव नगर परिसरातील सतगुरू नगर भागातील एका मंदीरा शेजारील रस्त्यावर लोकांनी एकच गर्दी केली होती. पोलिसांची गाडी पहाताच लोकांनी काढता पाय घेतला. काही क्षणातच पोलीस घटनास्थळी पोहोचले. घटनास्थळावर एक ३० ते ३५ वर्षीय तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. ...पान २ वर



आरोपी शिंदे



आरोपी कांबळे

## देहरादून बोगस एन्काऊण्टर प्रकरणी सीबीआय सर्वोच्च न्यायालयात!

क्राईम स्टोरी/लक्ष्मणराव पाटोळे



**पोलिसांकडून झालेल्या बनावट चकमकी या काही नव्या नाहीत आणि याबाबत काही पोलिसांना न्यायालयाने शिक्षा सुद्धा दिली आहे. गुजरात मधील सोहराबुद्दीन आणि त्याची पत्नी कौसर बी यांचे बोगस एन्काऊण्ट प्रकरण देशभर गाजले होते आणि यात गुजरातचे दि आय जी वंजारा यांच्यासह अनेक पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षाही झाली. असेच एक फेक एन्काऊण्ट प्रकरण देहरादूनमध्ये गाजले होते. गाझियाबाद वरून नोकरीसाठी इंटरव्ह्यू द्यायला गेलेल्या एका विद्यार्थ्याचे पोलिसांनी एन्काऊण्ट केले होते. या प्रकरणी १८ पोलिसांना जन्मठेप झाली होती, पण हे प्रकरण पुढे उच्च न्यायालयात जाताच उच्च न्यायालयाने ११ जणांना निर्दोष सोडले आणि ७ जणांची जन्मठेप कायम ठेवली. आता सीबीआयने या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला असून तिथे हे प्रकरण प्रलंबित आहे.**

सन २००९ चे ते वर्ष !...उत्तराखंड राज्यात घडलेल्या एका बनावट पोलीस चकमकीने संपूर्ण देशात खळबळ उडवून दिली होती. एका एमबीए पदवीधर विद्यार्थ्याला बदमाश घोषित करून १८ पोलिसांनी त्याचे एन्काऊण्टर केले होते. पण पुढे सीबीआय ...पान २ वर

## मुलाच्या अभ्यासाच्या टेन्शनने हैराण झाली चिमुकल्याला ठार मारून आत्महत्या केली

नाशिक/क्राईम रिपोर्टर



**अपेक्षांचे ओझे माणसाला इतक टेन्शन देऊन जाते कि कधी कधी त्यातून माणसाचे मानसिक संतुलन बिघडते आणि त्यातून मग काहीही घडू शकते. शिक्षणाच्या बाबतीत पालकांनी मुलांकडून अपेक्षा ठेवायला हरकत नाही, पण त्या किती ठेवायच्या यालाही काही मर्यादा आहेत आणि मुलांवर पालकांनी टाकलेल्या सततच्या अभ्यासाच्या दबावामुळे मुलेही चिडतात आणि बंडखोर बनून आई वडिलांचे ऐकत नाहीत. पण नाशिकमध्ये एका महिलेने नर्सरीत शिकणाऱ्या आपल्या साडेतीन वर्षाच्या मुलावर सतत अभ्यासासाठी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. पण तिला प्रतिसाद न मिळाल्यामुळे आणि अभ्यास बाबत मुलामध्ये कोणतीही सुधारणा न झाल्याने ती स्वतःच निराश झाली आणि तिने मुलाला ठार मारू स्वतःही आत्महत्या केली.**

शिखा आणि सागर पाठक हे दाम्पत्य नाशिक शहराच्या पाथर्डी फाट्यानजीक एका अपार्टमेंटमधे रहात होते. त्यांना रिधान नावाचा एक गोंडस मुलगा होता. साडेतीन वर्षाच्या रिधानचे खेळण्याचे वय होते. त्याची आई शिखा मात्र साडेतीन वर्षाच्या रिधानवर अभ्यास करण्यासाठी सारखे दडपण टाकत होती. जेमतेम नर्सरीमधील रिधानचे आजच्या कोरोना परिस्थितीला अनुसरुन ऑनलाईन शिक्षण घेत होता. त्याची आई शिखा ही कायमच त्याच्यावर अभ्यासाचे दडपण टाकत असल्यामुळे साडेतीन वर्ष वय असलेला रिधान वैतागला होता. त्यामुळे तो चिडचिड देखील करत होता. तो अभ्यास करायला नकार द्यायचा. तेव्हा शिखा नेहमी तिच्या वडीलांकडे आपल्या मुलाची तक्रार करायची की, 'रिधान ऑनलाईन अभ्यासाला बसत नाही. तो बिलकुल ऐकत नाही. ...पान २ वर

## अनैतिक संबंधामुळे घराण्याची अब्रू गेली पत्नीच्या प्रियकराची पतीनेच हत्या केली

जत/क्राईम रिपोर्टर



मयत दिलीप

**प्रत्येक माणसाला आपल्या घरची इज्जत प्यारी असते. त्यामुळे आपल्या कुटुंबातील एखाद्या महिलेचे जर दुसऱ्या कुणाशी सुत जुळले तर त्या कुटुंबातील पुरुषांना सहन होत नाही. अशा वेळी त्यांच्या अब्रूवर डाका घालणाऱ्या माणसाचा खून करायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. जत तालुक्यातील आसंगी येथे असेच झाले. जमिनीच्या व्यवहारातून एकत्र आलेले दोन मित्र पुढे एकमेकांचे कट्टर शत्रू बनले. कारण घरी येणाऱ्या मित्राने आपल्या मित्राच्या पत्नीलाच नादी लावले आणि तिचा उपभोग घेऊ लागला. मात्र हि गोष्ट गावात वाऱ्या सारखी पसरताच कुटुंबाची बेअब्रू होत असल्याचे पाहून त्या महिलेच्या पतीने आपल्या नातेवायीकाच्या मदतीने पत्नीच्या याराचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.**

दिलीप वाघे हा मुळचा जत तालुक्यातील आसंगी येथील होता. तो शेतजमीन विकत घेवून दरीबडची येथे राहत होता. तो शेतीबरोबरच काही दिवस वाळू उपाशाचे ही काम करीत होता.त्यातून त्याची ओळख ही बऱ्याचजणांबरोबर झाली होती. तो दरीबडची गावात शेतजमीन करीत होता. त्याच्या शेजारी हाके याची शेतजमीन होती. त्यामुळे त्याची हाके याच्या कुंटूंबातील महिलांशी ओळख निर्माण झाली होती. दरीबडची हे गाव जत तालुक्यातील शेवटचे गाव असून येथून कर्नाटक विजापूर हे जवळ आहे. जत विजापूर हायवेवरील दरीबा देवस्थान प्रसिध्द आहे. त्यालाच सिध्दनाथ देवस्वस्थान म्हणून ही ओळखले जाते. या देवस्थानला लागून फॉरेस्ट विभागाची जमीन असून त्याच्या शेजारी गावातील काही लोकांची वस्ती आहे. आसंगी येथून येवून दिलीप वाघे याने दरीबडची-तिल्याळ रस्त्यालगत काही एकर शेतजमीन विकत घेतली होती. त्या शेतात तो मजुर लावून काम करीत होता. दरीबडची येथेच यशंवत हाक्के व नवनाथ हाक्के याची शेतजमीन आहे. एका अर्थिक व्यवहारातून ...पान २ वर

CMYK

23 TO 29 AUGUST 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 21/08/2021 9:51 PM Page 1



पान १ वरून....

## अनेक महिलांचे लैंगिक शोषण ...

आणि सावज महिला असेल तर मग तिचे लैंगिक शोषण हि केले जाते. कांदिवली बोरीवलीमध्ये अशाच प्रकारे महिलांचे आर्थिक आणि लैंगिक शोषण करणाऱ्या एका भोंदू बाबाला महिलेनेच पकडून दिले. पती बरोबर भांडणे होतात आणि कुटुंबात कलह माजल्याने हि महिला त्या भोंदू बाबाकडे गेली होती. पण गोड गोड बोलून त्याने तिचेही शोषण केले. त्यामुळे तिने पोलिसांकडे धाव घेऊन या भोंदू बाबाला पकडून दिले. अंधश्रद्धा पसरू नये म्हणून अनेक सामाजिक संस्था अनेक उपक्रम राबवत नागरीकांच्या मनातील अंधश्रद्धा दुर करण्याचा प्रयत्न करीत असतात. अरूनीता (नाव बदलेले आहे) खूप तणावग्रस्त होती. संसारात तिचे नीट लक्ष लागत नव्हते. पतीसोबत संबध बिघडलेले होते. तिच्या चारही बाजूने डोक्याला ताप होता.घरची घडी पार विस्कळीत झालेली होती. खूपच ती त्रस्त होती. अशातच तिला कुणीतरी भोंदूबाबाचा रस्ता दाखवला. तशी ती भोंदू बाबाच्या मागे लागली. हा बाबाच आपल्या सर्व समस्यांपासून मार्ग काढून देऊ शकतो असा विश्वास तिला वाटत होता पण... पीडितेला या भोंदूने माझ्याकडे दिव्य शक्ती आहे. माझ्याकडे तंत्र मंत्र याची संपूर्ण माहिती आहे. या तंत्र-मंत्र जोरावर मी तुझा संपूर्ण कौटुंबिक कलह दूर करेन, अशी बतावणी करून त्या भोंदू बाबाने तिला आपल्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तो त्या पीडितेला अंगारे-धुपारे देऊ लागला. ती महिलाही या भोंदूच्या बोलण्यात फसून रोज त्याच्याकडे येऊ लागली. या भोंदू बाबांना आपल्या बोलण्यात या महिलेला गुंतवले आणि तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवायला सुरुवात केली. यानंतर त्या पिडीत महिलेची आर्थिक व शारीरिक लूट सुरू झाली होती. या भोंदूबाबाचा रोजचाच हा उपक्रम सुरू झाला होता. कुटुंबातील कलह, आर्थिक समस्या, यासारख्या समस्यांनी ग्रासलेल्या महिलांना समस्येतून सुटका करण्याचे आश्वासन देऊन त्यांना आपल्या जाळ्यात ओढून शरीराची भूक भागवणाऱ्या एकाय़ भोंदूबाबाचा भांडा फोड झाला आहे. हा भोंदू बाबा मनाने त्रस्त असलेल्या भयभीत झालेल्या आणि संकटात अडकलेल्या महिलांना सावज म्हणून हेरायचा आणि त्यांच्याशी शरीर संबंध प्रस्थापित करायचा,यातील एक पीडितेने दिलेल्या तक्रारीनंतर या भोंदूच्या कांदिवली पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. प्रणव शुक्ला असे या भोंदूचे नाव आहे. कांदिवली आणि बोरिवली परिसरातल्या हाय प्रोफाईल परिसरात त्याने आपले भोंदूगिरीचा व्यवसाय थाटला आहे. मात्र, हा बाबा कशा प्रकारे भोंदुगिरी करतो आणि महिलांना आपल्या वासनेचा शिकार कसा बनवतो. याचे सगळे पितळ एका महिलेने उघड केले आहे. कांदिवली परिसरात राहणाऱ्या पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. २०१०-११मध्ये या पीडित महिलेची तिच्या पतीसोबत भांडणे होत होती. मात्र घरामध्ये होणारा कलह थांबावा म्हणून ती देव देकृषी करण्याकडे वळाली आणि या भोंदू बाबाच्या संपर्कात आली. त्यावेळी पीडितेला या भोंदूने माझ्याकडे दिव्य शक्ती आहे. माझ्याकडे तंत्र मंत्र याची संपूर्ण माहिती आहे. या तंत्र-मंत्र जोरावर मी तुझा संपूर्ण कौटुंबिक कलह दूर करेन, अशी बतावणी करून आपल्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तो त्या पीडितेला अंगारे-धुपारे देऊ लागला. ती महिलाही या भोंदूच्या बोलण्यात फसून रोज त्याच्याकडे येऊ लागली. या भोंदू बाबांना आपल्या बोलण्यात या महिलेला गुंतवले आणि तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवायला सुरुवात केली. पीडित महिलेला या भोंदूच्या जाळ्यात अडकून काहीतरी विपरीत घडते आहे, हे लक्षात येऊ लागले. त्यानंतर या महिलेने थेट कांदिवली पोलीस स्टेशन गाठले आणि तिची फसवणूक झाली असून तो भोंदू इतरांचीही फसवणूक करत असल्याचे पीडितेने आपल्या तक्रारीत स्पष्ट केले. त्यानंतर पोलिसांनी या भोंदू बाबाला बेड्या ठोकल्या. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा भोंदू बाबा कांदिवली बोरिवली परिसरातल्या हायप्रोफाईल भागात आपले ऑफिस बनवायचा आणि तिथून येणाऱ्या भक्तांना गंडा घालायचा.

## मित्राच्या मुलाचा त्याने 'नरबळी'...

वैद्य याच्यापुढे अवघड प्रान उभा राहिला होता.त्याना काय करावे आणि काय नको असे झाले होते.ते अशा एका मुलाच्या शोधात होते. जो त्याना नरबळी देता येईल परंतू सुरूवातील त्याच्यासमोर कुणाचा नरबळी दयायचा हा प्रश्न होता.त्या महाराजाने नरबळी देणेस सांगून बरेच दिवस उलटले होते. तरीही त्यांना कुणाचा नरबळी दयायचा आणि त्यासाठी कुणाला हेरायचे हा प्रश्न होता.ते विचार करीत असताना एकदम त्याच्या डोळ्यासमोर त्याचा मित्र रवींद्र पाटील याचा सात वर्षीय मुलगा वरद हा आला. वैद्य याचे पाटील याच्या घराकडे सारखे येणे जाणे असल्याने ते त्याला ओळखत होते.त्यात वरद ही त्याना काका म्हणूनच बोलवत होता. वरद हा दत्तात्रय वैद्य याच्या नजरेसमोर आल्याने तो सारखा वरद याला खाऊचे अमिष दाखवून आपल्याबरोबर नेत होता. वरद याच्या घरातील लोकांना दत्तात्रय याच्याविषयी कसलीच शंका नव्हती. एक तर तो वरद याचे वडिल रवींद्र पाटील याचा जवळचा मित्र होता. त्या दोघांचे घरोब्याचे घरच्यासारखे संबंध होते.त्याला मुलबाळ नसल्याने तो वरद याला आपल्या मुलासारखे बघत असावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे तो वरद याला बाहेर घेऊन गेला की त्याना कसली ही शंका येत नव्हती. दत्ताच्या मनातील रवींद्र किंवा त्याच्या घराच्या लोकांना ओळखता आले नाही.दत्ता हा त्याचा जवळचा मित्र असल्याने सुख दुःखात ते त्याला आपल्यात सामील करून घेत होते. अशातच रवींद्र पाटील याच्या सासरवाडी सावर्डे बुद्रक येथे त्याच्या सासऱ्याने नवीन घर बांधले असल्याने त्या घराची वास्तुशांती त्याचे सासरे दत्तात्रय शंकर म्हातुगडे यांनी जावाई व मुलीला त्या कार्यक्रमासाठी मंगळवार दि.१७ ऑगस्ट रोजी सावर्डे बुद्रक येथे बोलावले होते. सासऱ्याच्या घराची वास्तुशांती असल्याने रवींद्र पाटील हे सोनाळी येथून पत्नी मुलासह गेले होते. त्याच्याबरोबर रवींद्र यांनी जवळचा मित्र म्हणून दत्तात्रय उर्फ मारूती वैद्य आणि त्याच्या पत्नीला ही नेले होते. सकाळी वास्तुशांतीचा कार्यक्रम झाल्यावर रवींद्र आणि त्याचे कुंटूंब हे आपल्या सासरवाडीत मुक्कामाला राहिले. त्याचेबरोबर दत्तात्रय वैद्य ही आपल्या पत्नीसह राहयला होता. त्या दिवशी रात्री ८.१५ च्या दरम्यान घराच्या अंगणात खेळत असलेला वरद हा अचानक नाहीसा झाला होता. वरद खेळता खेळता बेपत्ता झाल्याने त्याचे घरचे लोक परिसरात त्याचा शोध घेऊ लागले होते. सावर्डे बुद्रक येथील शेतात विहिरीत आणि जवळच्या परिसरात रवींद्र पाटील त्याचे सासरे दत्तात्रय म्हातुगडे आणि त्याचे नातेवाईक शोध घेत होते. वरद याचा शोध घेणेकामी दत्तात्रय वैद्य हा ही त्याचेबरोबर त्या रात्रीपर्यत होता. रात्री त्याचा शोध न लागल्याने रवींद्र याचे सासरे दत्तात्रय म्हातुगडे यांनी मुरगुड पोलीस स्टेशन गाठून आपला नातू वरद रवींद्र पाटील (वय ७) हा मंगळवार रात्रीपासून घराच्या अंगणातून बेपत्ता झाला आहे. त्याचे कुणी तरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केले असावे अशी तक्रार त्यांनी पोलीसात दिली. सातवर्षीय मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दाखल झाल्यावर मुरगुड पोलीस ही बेपत्ता वरद पाटील याचा शोध घेत होते. दोन तीन दिवस झाले तरी वरद याचा शोध लागत नसल्याने पोलीसाबरोबरच रवींद्र पाटील त्याचे सासरे दत्तात्रय म्हातुगडे आणि इतर नातेवाईक चिंतेत होते. तो आपल्या गावी कुणाला सोनाळी येथे कुणाबरोबर तरी चुकून गेला असेल अशी शंका आल्याने रवींद्र पाटील यांनी सोनाळी येथे ही जावून त्याचा शाषध घेतला होता. परंतू तेथे ही तो त्याना मिळाला नाही. मुरगुड पोलीस त्याचा कसून शोध घेत होते. रवींद्र पाटील याना कुणावर काही संशय आहे का? किंवा तुमचे कुणाबरोबर काही भांडण देणे घेणे आहे का? असे विचारले होते. परंतू त्याचे कुणाबरोबर कसलेच वैर नसल्याने पोलीस ही वरद याचा शोध घेत असताना गोंधळलेले होते. त्यातच शुक्रवार दि.२० ऑगस्ट रोजी सावर्डे बुद्रक येथील लक्ष्मीनगर शेजारील दक्षिणेस असणाऱ्या शेतवडीत एका मुलाचा सडलेला अवस्थेत मृतदेह पडला असल्याची माहिती रवींद्र पाटील आणि त्याच्या नातेवाईकांना समजल्यावर ते सगळे घटनास्थळी गेले. तर तेथे शेतातील मातीत पालथ्या अवस्थेत वरद याचा मृतदेह पडला असल्याचे त्यांना दिसून आले. त्याचा मृतदेह सडत आणि कुजत चाललेला होता. गावातील काही जनावरांनी त्याचा मृतदेह ही कुतरडलेला होता. या घटनेची माहिती समजातच घटनास्थळी लोकांची गर्दी झाली होती. रवींद्र पाटील आणि त्याच्या पत्नी व इतर नातेवाईकांनी वरद याचा मृतदेह पाहून अक्रोश केला होता. या घटनेची माहिती मुरगुड पोलीसांना देण्यात आल्यावर मुरगुड पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गर्दी हटवून घटनास्थळाचा आणि मृतदेहाचा पंचनामा करून या घटनेची माहिती रवींद्र याच्याकडून घेतली होती. त्याना ही या घटनेबाबत काहीच सांगता येत नव्हते. ते फक्त पोलीसांना हे असे कसे झाले हो म्हणत अक्रोश करीत होते. घटनास्थळी सोनाळी आणि सावर्डे बुद्रक येथील लोकांनी गर्दी करून पोलीसांना घेराव घालत जोपर्यत या घटनेतील संशयीताला गावच्यांच्या समोर हजर करीत नाही तोपर्यत वरद याचा मृतदेह हलवू देणार नाही असे सांगून त्यांनी पोलीसांची वाहने दोन तास अडवून धरले होते. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिक्षक आर.आर.पाटील आणि मुरगुड पोलीस ठाण्याचे स.पो.नी.विकास बडवे यांनी ग्रामस्थांना संशयीत आरोपीला जास्ती जास्ती शिक्षा होणेसाठी प्रयत्न करू असे आश्वासन ग्रामस्थांना दिल्यावर ते शांत झाले. घटनास्थळी पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे, अप्पर पोलीस अधिक्षक तिरूपती काकडे यांनी भेट देवून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या. पोलीसांनी वरद याचा मृतदेह पंचनामा करून कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला.घटनास्थळी आलेल्या महिला पोलीसांना ही वरद याचा मृतदेह पाहून त्याचे ही डोळे पाणावले होत. त्यातच मयत वरद याचे आई वडिलांनी केलेला अक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. पोलीस या घटनेचा तपास रवींद्र पाटील व त्याच्या नातेवाईकाकडे करीत असताना त्यांनी रवींद्र पाटील याचा मित्र दत्तात्रय उर्फ मारूती वैद्य याच्याकडे ही चौकशी करीत असताना त्यांना वैद्य याच्या बोलण्यात विसंगती जाणवत होती. पोलीसांनी त्याला पोलीस स्टेशनला आणून अधिक चौकशी केली असता घटनेच्या दिवशी म्हणजे दि.१७ ऑगस्ट रोजी रात्री ८.१५च्या दरम्यान त्यानेच वरद हा अंगणात खेळत असताना त्याा गोड बोलून नेले. घरापासून लांब अंतरावर नेऊन त्याने त्याचा जोरात गळा आवळून धरला. त्याच्या ताकदीपुढे त्याचे काही चालले नाही. क्षर्णाधात त्याचा श्वास कोंडला गेल्याने मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच दत्तात्रय वैद्य याने त्याचा मृतदेह रात्रीच्या अंधारात कुणाला लक्षात येणार नाही अशा लक्ष्मीनगर येथील शेतवडीत नेऊन टाकला आणि आपण घरी परत आला. त्याचबरोबर तो वरद याचा शोध घ्यायला ही रवींद्र पाटील याच्या नातेवाईकाबरोबर फिरू लागला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन बोलते केले असता त्याने वरद याचा खून आपणच केल्याचे कबुल केले. परंतु तो खून त्याने कशासाठी आणि का केला? याची माहिती तो पोलीसांना देवू शकला नाही. पोलीसांनी त्याचेकडे केलेल्या प्राथमिक चौकशीत त्याचे लग्न होऊन १५ वर्ष झाली तरी त्याला मुलबाळ होत नव्हते. त्यातून तो अपशेट झाला होता. या कारणातून त्याने मित्र रवींद्र पाटील याचा मुलगा वरद याला बोलावून नेऊन त्याचा गळा आवळून खून केल्यचो सांगितले. वरद याचा खून त्याने कुणाच्या सांगण्यावरून केला.की त्याचा नरबळी दिला याचा तपास पोलीस करीत आहेत. मित्रानेच आपल्या मुलाचा घात केल्याचे बघून रवींद्र पाटील हे ही दत्तात्रय वैद्य याचेवर चिडले होत. ते त्याला मारायला ही गेले. परंतू त्याना पोलीसांनी अडविल्याने तो शांत बसला होता. त्याने वरद याच्या खूनाची कबुली दिल्याने मयत रवींद्र पाटील याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी वरद रवींद्र पाटील याचे अपहरण करून खून केल्या कारणातून दत्तात्रय उर्फ मारूती वैद्य याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास मुरगुड पोलीस स्टेशनचे स.पो.नी. विकास बडवे याच्या मार्गदर्शना खाली पो.उप.निरी. किशोरकुमार खाडे, उप.निरी.के.डी ढेर, सतीश वर्णे, स्वप्नील मोरे, संदीप ढेकळे, राम पाडळकर करीत आहेत.

## उसन्या पैशावरून त्यांच्यात वाद ...

त्याच्या बाजूला एक मोटर सायकल उभी होती. मोटरसायकलीवर रक्ताचे डाग दिसत होते. सदरील तरुणाच्या पोटावर छातीवर डोक्यावर चाकू सारख्या धारदार शस्त्राने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या. त्याच्या शरीरातून रक्ताचा पाट वाहत होता. मयत आणि मारेकरी यात बरीच झटापट झाल्याच्या खुणा दिसत होत्या. मयताच्या अंगावर जीन्स आणि टी शेर्ट व पायात लाल बूट होते. त्याचा चेहरा संपूर्ण रक्ताने माखलेला दिसत होता. मयताच्या आजूबाजूला रक्ताच्या थारोळ्यात पसरला होता. मारेकर्यांनी अतिशय निर्घृणपणे हत्याकांड घडवून आणला होता. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय कुमार पुजारी यांनी आजुबाजूला परिसरात चौकशी करून घटनेची प्राथमिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला. सदरील मयत व्यक्तीचे नाव गोकुळ बंडूलाल मंत्री असे असून तो दादाजी कोंडदेव नगर परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी तात्काळ दादाजी कोंडदेव नगर येथे संदेश पाठवून मयत गोकुळ मंत्री यांच्या नातेवाइकांना माहिती देऊन घटनास्थळाकडे बोलावून घेतले. दरम्यान घटनास्थळालाकडे अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले यांनी धाव घेतली. तेथे उपस्थित असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना देऊन पंचनामा करण्यास आदेश दिले. दरम्यान मयत गोकूळ मंत्री याची पत्नी अकांक्षा मंत्री आपल्या नातेवाईकासह घटनास्थळी आली. घटस्थळी येताच तिन विलाप करण्यास सुरूवात केली. पोलिसांनी घटनास्थळाचा परीसर पिंजून काढला.आवश्यक ती माहीती हास्तगत करून प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविले. मयताची पत्नी आकांक्षा गोकुळ मंत्री यांच्याकडे अधिक माहीती घेतली असता तिने माझे पती खाजगी फायनान्स चालवत होते. त्यातूनच त्यांचा खून झाला आसल्याचे सांगून दोन तरूणावर संशय व्यक्त केला. मयताची पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गु.र.नं. ३१५/२०२१ कलम ३०२,३४ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव ,लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्रे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजीवकुमार पुजारी यांच्या हाती देण्यात आले. दरम्यान जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे यांनी शहरातील सर्वच पोलिस ठाण्यांना समांततर तपासाचे आदेश दिले. शहरातील सर्वच पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी गोकूळ मंत्री खून प्रकरणाचा छडा लावण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तयार करून संशयीत आरोपीच्या मागावर पाठविले. एकडे शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पुजारी यांनी तपासाची चक्रे गतिमान करून मयत गोकुळ मंत्री यांची प्राथमिक माहिती घेण्यासा सुयवात केली. गेल्या ३० ते ३५ वर्षापूर्वी परराज्यातून बंडूलाल मंत्री हे आपल्या कुटुंबासह लातूर येथे आले होते. बंडूलाल मंत्री लातूरात आचारी म्हणून काम करू लागले. एक नामवंत आचारी म्हणून त्यांची ख्याती होती. मोठमोठ्या लग्नसमारंभात ते आचारी म्हणून काम करू लागले. दरम्यान ते लातूर शहरातील मोती नगर परिसरात राहत होते. तेथे त्यांनी आपल्या कमाईतून एक जागा ही खरेदी केली त्या जागेवर चांगली वास्तू बांधून ते आपल्या कुटुंबासह राहू लागले. दरम्यानच्या काळात त्यांना तीन मुले अशी आपत्ती झाली. त्यातीलच एक हा गोकुळ. गोकुळ हा सुरुवातीपासूनच उनाडक्या करणारा करणारा होता. त्यामुळे त्याच्या घरचे ही त्याच्यावर नाराज झाले होते दरम्यान. मोती नगर येथील घर विक्री करून त्याचे दोन भाऊ आई पुणे येथे राहण्यास गेले होते. तर गोकूळ यांनी शहरातील दादाजी कोंडदेव नगर भागात एक घर विकत घेवून आपले वास्तव्य कायम केले होते. दरम्यानच्या काळामध्ये गोकुळ मंत्री यांने शहरातील कन्हेरी रोड परीसरातील एका मुली सोबत प्रेम विवाह केला होता. त्याला दोन आपत्ती ही झाले होते. तसेच तो आपल्या सहवासात असणाऱ्या लोकांना कमी-अधिक व्याजाने पैसे देऊन तो खाजगी फायनान्स चालवत होता.तो पुर्वी गुन्हेगारीवृत्तीचा होता. शहरातील बऱ्याच पोलिस ठाण्यात त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत अशी माहीती शिवाजी नगर पोलिसांनी स्तिगत केली. ही सर्व माहीती एकत्र करीत शिवाजी नगर पोलिसांनी तपासाची दिशा ठाविली.बहूतेक गोकुळ मंत्री याचा खून जुन्या वादातून किंवा जुन्या दश्मनीतून झाला आसावा असा प्राथमिक अंदाज लावला. हास्तगत केलेल्या माहीती अधारे तपासाची दिशा ठरवण्याच्या बेतात आसलेल्या पोलिस निरीक्षक संजीवकुमारी पुजारी एक संदेश मिळाला. गोकुळ मंत्री खून प्रकरणातील आरोपी प्रसाद शिंदे हा पोलिस ठाण्यात हजर झाला आहे. संदेश मिळताच पोलिस निरीक्षक पुजारी यांनी त्याला ताब्यात घेवून अधिक विचारपूस केली असता. त्यांने आणी कैस्तुभ कांबळे नामक अन्य एका मित्राने गोकूळ मंत्री याला मारलयाचे कबूल केले. यावरून पोलिसांनी कैस्तुभ संजय कांबळे याच्या मागावर पोलिसांचे एक पथक पाठविले. दरम्यान गांधी चौक पोलिस ठाण्याच्या पोलिस पथकाला कौस्तुभ कांबळे रिंग रोड परीसरात आसल्याची माहीती मिळाली. ही माहीती शिवाजी नगर पोलिसांना देण्यात आली. शिवाजीनगर पोलिसांच्या पथकाने रिंगरोड परीसरातून कौस्तुभ संजय कांबळे याच्या मुस्क्या आवळल्या. त्याला शिवाज नगर पोलिसात हजर केली असता त्यांने आपल्या गुन्ह्याची कबूली दिली. दोघा संशयीत आरोपींना ताब्यात घेवून अधिक विचापूस करून गोकुळ मंत्री याला ठार मारण्याचे कारण विचारले असता त्यांनी सांगण्यास सुरूवात केली. प्रसाद विठ्ठलराव शिंदे आणि कौस्तुभ संजय कांबळे हे बालपणापासून मित्र होते. यशवंत नगर भागात एकाच गल्लीत राहणारे असल्याने ते दूर एकमेकांना दररोज भेटत होते. या दोघांमध्ये चांगली मैत्री होती. एकमेकांच्या सुख दुःखात ते नेहमी धावून येत होते. दरम्यान महाविद्यालयीन जीवनात त्यांना भौतिक सुखाचे आणि मौजमजा करण्याचा छंद लागला होता. त्यातूनच ते मादक पदार्थांचे व्यसन देखील जडले होते. दरम्यान गेल्या लोक डाऊन मध्ये प्रसाद विठ्ठल शिंदे आणि गोकुळ मंत्री यांची भेट झाली होती. या भेटी दरम्यान प्रासाद शिंदे यांने गोकूळकडून १ हजार रूपये घेतले होते. याच पैश्यावरून गेल्या लॉकडाऊन काळात गोकुळ मंत्री यांने प्रसाद शिंदे याला मारहाण केली होती. त्याचा राग प्रसाद शिंदे यांच्या डोक्यात घोळत होता. गोकुळ मंत्री यांनी मारलेले गोष्ट प्रसाद शिंदे याला खटकत होती. तो बदला घेण्याच्या तयारीत होता. हा विचार त्याने आपला मित्र कौस्तुभ संजय कांबळे यांच्याकडे बोलून दाखवला होता. दोघेही जिगरी मित्र असल्याने गोकुळ मंत्री याला धडा शिकवण्याचे दोघाने ठरवले. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे प्रयत्न केले पण सारे प्रयत्न निष्फळ झाले. दिनांक ९ ऑगस्ट २०१९ रोजी रात्री मादक पदार्थांच्या आहारी गेलेल्या प्रसाद शिंदे आणि कौस्तुभ कांबळे यांनी मादक पदार्थ खरेदी केले होते. दरम्यान रात्री सेवन करून उरलेले गांजासारखे मादक पदार्थ ते दुपारी रिंग रोड परीसरातील एका पान टपरीवर घेणार होते. ते दोघे दुपारी रिंग रोड परिसरात एका पान टपरीवर आले. दरम्यानच्या काळामध्ये गोकुळ मंत्री हात तेथे आला. गोकुळ मंत्री याला या दोघांनी चहापाणी केले तसेच त्याला कुळे जात आहेस विारले. तेंव्हा सतगुरू नगर भागाकडे जाणार आसल्याचे गोकुळ यांने या दोघाला सांगितले. ही संधी साधून या दोघांनी आपल्या मनात घोहत आसलेला कट रचला. त्याचाच गाडीवर बसून ते दादाजी कोंडदेव नगर परिसरातील सद्गुरूनगर जवळ आले. तेथे येताच गोकुळ मंत्र्यांनी प्रसाद शिंदे यांच्याकडे पैशाची मागणी केली. पैशा वरून प्रसाद शिंदे .आणि गोकुळ मंत्री यांच्यात वाद झाला याच वादातून हाणामारी देखील झाली. प्रसाद यांनी सोबत असलेल्या धारदार चाकुसारख्या हत्याराने गोकूळवर वार केले. प्रसादला कौस्तुभनेही मदत केली. शरूत्राचे सपासप वार वर्मी लागल्यामुळे गोकूळ आपल्या मोटर सायकल एम एच २० बी ४०३९ वरून जमीनीवर पडला. त्याच्या शरीरातून रक्ताचे पाट वाहू लागले. गोकुळच्या हालचाली बंद होताच भानावर आलेले प्रासाद शिंदे आणी कौस्तुभ कांबळे तेथून पळून गेले. या खून प्रकरणासाठी आरोपीने वापरलेले हत्यार , रक्ताने माखलेले कपड पोलिसांनी जप्त केले. ही कामगिरी जिल्हा पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, लातूर शहर उपविभागीय पोलिस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी नगर पोलिस ठाणे, गांधी चौक पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी पार पाडली. या प्रकरणाचा पुढील पोलिस निरीक्षक संजीवकुमार पुजारी करीत आहेत.

## देहरादून बोगस एन्काऊण्टर प्रकरणी...

चौकशीत तथ्य समोर येऊन पोलिसांचे पितळ उघडे पडले... उत्तर प्रदेशच्या गाजियाबाद शहरात राहणारा एक हुशार विद्यार्थी रणवीर सिंग हा एमबीए पदवीधर झाला होता. त्याला डेहराडूनमध्ये एका खाजगी कंपनीत ३ जुलै २००९ रोजी नोकरीकरता मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यासाठी तो २ जुलैलाच गाजियाबादहून डेहराडून येथे रस्तेमार्गाने रवाना झाला होता. तिथे तो त्याचा एक मित्र रामकुमार याच्याकडे उतरला होता. ३ जुलै रोजी त्याने कंपनीत जाऊन मुलाखत दिली आणि या मुलाखतीत तो उत्तीर्ण झाला. त्याला पुढच्याच दिवसापासून, ४ जुलैपासून कामावर रुजू होण्यास सांगितले गेले. मात्र, दि. ४ जुलैच्या उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या वृत्तपत्रांत पहिल्या पानावर एक एन्काऊण्टर झाल्याची बातमी छापून येते. या बातमीत एन्काऊण्टर झालेल्या ज्या कथित बदमाशाचे छायाचित्र छापलेले असते ते या रणवीर सिंग याचे होते! रणवीर सिंग याच्या कुटुंबियांच्या घरी आलेल्या वृत्तपत्रात आपल्या मुलाचे एन्काऊण्टर झाल्याची बातमी वाचून कुटुंबियांच्या पायाखालची जमीनच सरकते. मुलगा नोकरीसाठी डेहराडूनला जातो काय आणि दुसऱ्या दिवशी त्याच्या एन्काऊण्टरची बातमी वाचावी लागते काय; सारेच अनाकलनीय!... बातमीत डेहराडून पोलिसांनी असे म्हटले होते की, डेहराडूनमध्ये राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील आलेल्या होत्या. त्यानिमित्त शहराच्या प्रमुख रस्त्यांवर नाकाबंदी व वाहतुकीचे नियमन करण्यात आले होते. त्यावेळी एक बदमाश व त्याचे दोन साथीदार हे ड्युटीवर तैनात पोलीस अधिकारी जे.डी. भट्ट यांचे सर्विस रिवाल्व्हर घेऊन पळाला आणि त्याने राष्ट्रपतींच्या वाहन ताफ्यावर हल्ला करू नये यासाठी पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. हा बदमाश मोटारसायकलीवरून आलेला होता. त्याच्या सोबत त्याचे दोन साथीदार होते. मात्र ते पळून जाण्यात यशस्वी ठरले व हा बदमाश पोलिसांच्या हाती लागला. या बदमाशाने पोलिसांवर गोळीबार केला, प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात हा बदमाश ठार झाला. एक मोठा घातपात होण्यापासून टळला... डेहराडूनच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी रितसर पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली होती. यावेळी एन्काऊण्टरमध्ये भाग घेतलेल्या १८ पोलिसांना शाबासकी देण्यात आली होती. मात्र, रणवीर सिंग याच्या पालकांनी वृत्तपत्रांत बातमी छापून आल्याच्या दिवशीच डेहराडूनला धाव घेऊन संबंधित पोलीस ठाणे गाठले व पोलिसांना घेरले. पोलिसांनी चुकीची बातमी दिलेली असून पोलिसांनी आपल्या मुलाला बदमाश ठरविण्यात गल्लत केली असल्याचा त्यांचा दावा होता. मात्र पोलीस सध्या विजयाच्या धुंदीत होते. त्यांनी पालकांचा दावा फेटाळून लावला आणि पालकांना पिटाळून लावण्यासाठी त्यांच्यावर लाठीमार केला. यावर संतप्त झालेल्या पालकांनी प्रसारमाध्यमांकडे धाव घेतली आणि अन्यायाला वाचा फोडली. पालकांनी आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ काही पुरावे समोर ठेवले. ते प्रसारमाध्यमांनी उचलून धरले. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा होता की, रणवीर सिंग हा एन्काऊण्टर करण्याएवढा काही नामचीन गुंड नव्हता. मूळात तो गुंडच नव्हता. कारण रणवीर सिंगवर एकाही पोलीस ठाण्यात एकही गुन्हा दाखल नव्हता... प्रसारमाध्यमांनी पालकांची बाजू छापून आणली त्याच दिवशी, म्हणजे ५ जुलैला रणवीर सिंग याच्या मृतदेहाचा शव विच्छेदन अहवाल हाती आला. या अहवालाने सर्वानाच हादरवून सोडले. कारण अहवालात स्पष्ट म्हटलेले होते की, रणवीर सिंग याच्या शरीरात एक नाही, दोन नाही तर तब्बल २२ गोळ्या घुसलेल्या होत्या. त्याच्या शरीरावर २८ जखमा होत्या आणि त्याची काही हाडे तुटलेली होती...याचा अर्थ रणवीर याला जबर मारहाण झालेली होती, हे स्पष्ट होते...शव विच्छेदन अहवालात हेही नमूद करण्यात आलेले होते की, रणवीरवर सर्व गोळ्या या अगदी जवळून म्हणजे पाईंट ब्लँक रेंजमधून झाडण्यात आलेल्या होत्या!... ही बाब बाहेर आल्यावर एकच हलकल्लोळ माजला. आता रणवीरचे पालकच नव्हे तर सर्वसामान्य जनता रस्त्यावर आली आणि डेहराडून पोलीस व सरकारला जाब विचारू लागली...या जनआक्रोशाने सरकार चिंतेत पडले आणि त्यांनी या एन्काऊण्टरची सीबी सीआयडी चौकशी करण्याचे घोषित केले. त्याप्रमाणे सीबी सीआयडीने चौकशीचे नाटक केले. एन्काऊण्टर करणाऱ्या पोलिसांचे जबाब त्यांनी नोंदवले. त्यात एकसूत्रता होती. त्यामुळेच संशयाला वाव निर्माण झाला. जनतेने आता या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली. अखेर उत्तराखंड सरकारने ३१ जुलै रोजी हे प्रकरण सीबीआयकडे सोपवले. सीबीआयने या प्रकरणी स्वतंत्रपणे गुन्हा दाखल करून घटनास्थळाचा वेध घेतला असता पोलिसी कहाणीतले खूप कच्चे दुवे त्यांच्या नजरेस पडले. एक म्हणजे रणवीर हा एन्काऊण्टर करण्याइतका मोठा गुंड नव्हता, मग त्याला पकडण्याऐवजी पोलिसांनी का ठोकले ? दोन म्हणजे रणवीर हा खरोखरच एमबीए पदवीधर असून त्याची गुन्हेगारी स्वरुपाची पार्श्वभूमी नाही. तो खरोखरच डेहराडूनमध्ये नोकरीसाठी मुलाखतीला आलेला होता व या मुलाखतीत तो उत्तीर्णही झाला होता. मग, एकाएकी असे काय घडले की, पोलिसांना त्याचे एन्काऊण्टर करावे लागले ? तिसरी बाब म्हणजे ज्या पोलीस अधिकाऱ्याचे सर्विस रिवाल्व्हर रणवीरने पळवल्याचा दावा केला गेला होता, ते रिवाल्व्हर एन्काऊण्टरनंतर हस्तगत का केले गेले नाही ? ते कुठे गायब झाले ? त्याच्या जागी रणवीरच्या मृतदेहाच्या हाती देशी कट्टा कुठून आला ?...या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे चकमकीत सहभागी डेहराडून पोलीस देऊ शकले नाहीत...यातच आणखी एक बाब समोर आली व ती म्हणजे रणवीर हा पोलिसांच्या ताब्यात होता. त्याला घेऊन डेहराडून पोलीस त्याच्या दोन फरार साथीदारांना शोधण्यासाठी एका फ्लॅटवर गेले होते. यावेळी अनेक लोकांनी या पोलीस फौजफाट्याला पाहिले होते व रणवीर हातात बेड्या घातलेल्या स्थितीत असल्याचे अनेकांना दिसले होते... असे असेल तर मग तो पळाला ही थिअरी आपोआपच गळून पडते. त्याने रिवाल्व्हर खेचून घेण्याचा प्रयत्न केला होता, हे जर नंतर घडले असेल तर मूळात त्याला अटक का करण्यात आले हा प्रश्न निर्माण झाला व ज्या वेळेत हे एन्काऊण्टर नाट्य घडले त्या वेळेत तो अटकेत होता, हे जर सिद्ध होत आहे, तर एफआयआरमध्ये नोंदवलेल्या वेळा चुकल्या कशा ? बरे, ती मानवी चूक मानावी तर मग पोलीस नियंत्रण कक्षात धाडल्या गेलेल्या तीन संदेशांचे काय ? त्यांच्या वेळा कशा चुकतील ? नियंत्रण कक्षाला धाडण्यात आलेला पहिला मेसेज म्हणतो की, एक बदमाश पोलिसांचे सर्विस रिवाल्व्हर खेचून फरार झाला आहे. थोड्या वेळाने धाडण्यात आलेला संदेश म्हणतो की, आरोपी हा जंगलाच्या दिशेने पळून गेला आहे व पोलीस पथक त्याच्या मागावर गेले आहे तर तिसरा मेसेज म्हणतो, चकमक सुरू आहे. आणखी पोलीस बळ पाठवा. चौथा मेसेज म्हणतो की, बदमाश पोलीस चकमकीत ठार झालेला आहे...हे मेसेज खरे असतील तर रणवीर सिंग पोलिसांच्या ताब्यात होता, हे आपण बघितल्याचे ठामपणे सांगणारे सभ्य समाजातील डझनभर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार कसे काय उभे राहिले? एकंदरच सीबीआय चौकशीत समोर आलेली बाब ही की, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचा डेहराडूनला दौरा होता व त्या रस्त्याने जाणार होत्या त्या रस्त्यावर पोलीस फौजफाटा तैनात होता. वाहतुकीचे नियमन केले जात होते. त्याचवेळी डेहराडूनमध्ये मुलाखतीसाठी आलेला रणवीर सिंग हा आपल्या दोन मित्रांसह मोटारसायकलीवरून अन्य एका मित्राकडे त्याच रस्त्याने चालला होता. त्याला पोलिसांनी रोखले व गाडी साईडला लावण्यास सांगितले. पण रणवीरने त्यास नकार देत वाद घालायला सुरुवात केली. राष्ट्रपतींचा दौरा म्हणून पोलीस आधीच दबावाखाली होते, त्यात रणवीर ऐकत नाही म्हटल्यावर त्यांचा पारा चढला. त्यांनी रणवीरवर हात उचलला. रणवीरनेही पोलिसांवर हात उगारला. धक्काबुक्की झाली व थोड्याच वेळात प्रकरण हातघाईवर आले. यावेळी रणवीरशी वाद घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने आपले पथक घटनास्थळी बोलावले. १८ पोलीस ताबडतोब तिथे धावून आले. हे पाहून रणवीरचे मित्र सटकले, पण रणवीर त्यांच्या हाती सापडला. त्याचे बखोट धरून ते त्याला पोलीस ठाण्यावर घेऊन गेले. तिथे रणवीरच्या उर्मटगिरीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी त्याच्यावर खोटेनाटे आरोप केले व त्याला बदमाश असे संबोधत त्याला बुकलायला सुरूवात केली. रणवीरवर हात साफ केल्यावर ते त्याला त्याच्या मित्रांचा पत्ता विचारू लागले. रणवीरला घेऊन ते मग एका फ्लॅटवर गेले. ते अनेक प्रत्यक्षदर्शींनी पाहिले. मित्र फ्लॅटवर न सापडल्याने पोलीस रणवीरला पुन्हा पोलीस ठाण्यात घेऊन आले आणि त्यांनी तिथे रणवीरला लाथाबुक्क्यांनी बेदम तुडवले. हा मार सहन न होऊन रणवीर बेशुद्ध पडला. आता हा मरणार, असे वाटल्याने पोलीस घाबरले. पोलीस कोठडीत आरोपीचा मृत्यू हा वृत्तपत्रीय मथळा त्यांना दिसू लागला. यातून मान सोडविण्यासाठी पोलिसांनी एक युक्ती रचली. पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करून खबर दिली की, आन ड्युटी पोलिसाचे रिवाल्व्हर खेचून घेऊन एक बदमाश फरार झाला आहे!... सीबीआयने या प्रकरणी १८ पोलिसांवर आरोपपत्र दाखल केले. याप्रकरणी खटला सीबीआयच्या विशेष न्यायालयात दिल्ली इथे चालविण्यात आला. दि. ६ जून २०१४ रोजी दिल्ली विशेष न्यायालयाने सर्व पोलिसांना दोषी मानून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. नंतर हे प्रकरण दिल्ली हायकोर्टात गेले असता, १८ पैकी ७ पोलिसांची जन्मठेपैची शिक्षा कोर्टाने कायम केली तर ११ जणांना ठोस पुराव्याअभावी दोषमुक्त केले. सीबीआयने यास आक्षेप घेत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असून तिथे हे प्रकरण आता प्रलंबित आहे.

## मुलाच्या अभ्यासाच्या टेन्शनने हैराण....

त्याला समजावून सांगा' फोन करुनही ती हेच सतत सांगायची. एक दिवस शिखाचा मोबाईल रिधानच्या हातातून खाली पडल्याने खराब झाला होता, त्यामुळे मागील सात दिवसांपासून रिधानचे ऑनलाईन स्कूल शिक्षण बंद पडले होते. त्याचे टेन्शन शिखाने घेतले होते. दि. ९ ऑगस्ट २०२१ रोजी सागर सुरेशचंद्र पाठक हे सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास कामावर गेले, तेव्हा आपल्यासोबत रिधानलाही घेवून गेले. त्यानंतर दुपारी साडेबारा वाजता ते घरी आले आणि रिधानला घरी सोडून परत कामावर निघून गेले. सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास शिखाने घरातील किरकोळ कामासाठी व भाजीपाला आणण्यासाठी वडील दिलीप शुक्ला यांना घराबाहेर पाठवून दिले. तेंव्हा रिधान घरात खेळत होता, तर शिखा घरात तिचे काम करत होती. तिची आई दुसऱ्या खोलीत टी.व्ही. पहात होती. घरात इतर कोणीही नव्हते. सुमारे पावणे तीन वाजण्याच्या सुमारास बाजारात गेलेले तिचे वडील दिलीप शुक्ला हे बाजार करुन घरी परतले. तेंव्हा त्यांची पत्नी एका खोलीत बसून टी.व्ही. पहात होती. शिखा व तिचा मुलगा रिधान असे दोघे जण त्यांच्या बेडरुममध्ये झोपले होते. दरवाजा आतून बंद होता. मुलगी आणि नातू दुपारी विश्रांती घेण्यासाठी गेले असतील असे शिखाच्या आईला वाटले. त्यामुळे तिने फारसे लक्ष दिले नाही. दुपारी ४ वाजता त्यांनी चहा बनवला. चहा शिखाला देण्यासाठी तिच्या रुमबाहेरुन त्यांनी आवाज दिला की, 'शिखा चहा पिणार का?' पण आतून आवाज येत नसल्याने त्यांनी तिच्या बेडरुमचा दरवाजा ठोठावला. परंतु आतून कोणीच काही उत्तर दिले नाही. पावणे पाच वाजण्याच्या सुमारास शुक्ला परत आले. त्यांची पत्नी त्यांना म्हणाली की 'अहो, बऱ्याच वेळेपासून शिखा झोपली आहे. तिला उठवा' पत्नीचे हे बोलणे ऐकून शुक्ला शिखाच्या बेडरुमकडे गेले. दरवाजावर थाप मारत ते तिला हाका मारु लागले. पण शिखाने काही दरवाजा उघडला नाही की आतून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. आतून काहीच आवाज येत नसल्याचे पाहून शुक्ला यांनी दरवाजाच्या फटीतून आतमध्ये बघितले, तेंव्हा त्यांना मुलगी शिखाची उभी असलेली सावली दिसली. त्यामुळे आत काहीतरी झाले आहे असा संशय त्यांना आला. त्यांनी तातडीने सांडशीने दरवाजाचा कोपरा थोडा उचकटून पाहिला असता शिखा बेडरुममधील फॅनला लटकलेली दिसली. हे दृश्य पाहून त्यांना धक्का बसला. त्यांनी लगेच जावई सागर पाठक यांना फोन करुन घरी बोलावून घेतले. 'शिखाने फाशी घेतली आहे. तुम्ही ताबडतोब घरी या' हा निरोप मिळताच सागर धावत-पळतच घरी आले. घरी आल्यावर सागर पाठक यांनी बेडरुमचे लॉक तोडले. ते बेडरूममध्ये गेले असता शिखाने घरातील पंख्याला गळफास घेवून आत्महत्या केली होती. ती पंख्याला लटकलेली होती. त्यांनी तिला खाली उतरवले, तर रिधान हा बेडवर हालचाल करत नव्हता. त्याच्या नाका-तोंडातून रक्त येत होते. तशा अवस्थेत तो बेडवर पडलेला होता. त्याच्या बाजूलाच उशी पडलेली होती. रिधान यास शिखाने उशी तोंडावर दाबून मारलेले दिसत होते. हे सर्वाच्या लक्षात आले, तरीही तो जिवंत असावा म्हणून त्याला एका खाजगी रूग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून तो मयत झाला असल्याचे घोषीत केले. इंदिरानगर पोलीस ठाण्यात या घटनेची खबर देण्यात आली. वरीष्ठ पोलीस निरीक्षक निलेश माईनकर यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळासह मयत शिखा व रिधान यांच्या मृतदेहांचा पंचनामा केला व पी.एम.साठी जिल्हा रुग्णालयात रवाना केले. नातू रिधान याचा क्रूरपणे खून केल्याबद्दल त्याची माता शिखा सागर पाठक हिच्याविरोधात तिचे वडील दिलीप केशव शुक्ला यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यावरून शिखा सागर पाठक उर्फ उली हिच्याविरोधात पोटचा मुलगा रिधान सागर पाठक (वय साडेतीन वर्षे) याचा निघृणपणे खून केल्याचा गुन्हा दाखल केला. शिखाने आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहून ठेवलेली होती. 'आत्महत्येसाठी कोणालाही जबाबदार धरू नये. मी जे केले ते योग्य केले.' या चिठ्ठीमुळे या गुन्ह्याचा स्पष्ट खुलासा झाला. पोलीस उपायुक्त विजय खरात, सहाय्यक आयुक्त सोहेल शेख यांनीही घटनास्थळी धाव घेवून गुन्ह्याची माहिती घेतली. ऑनलाईन अभ्यास करत नसल्याच्या कारणावरून शिखाने आपल्या मुलाच्या तोंडावर उशीने दाबून त्याचा खून केला, नंतर स्वतःही पंख्याला गळफास घेवून आत्महत्या केली.

## अनैतिक संबंधामुळे घराण्याची अब्रू...

दिलीप हाक्के आणि नवनाथ हाक्के यांचे संबंध जुळले होते. त्यामुळे दिलीप याचे हाक्के याच्या घराकडे सारखे येणे जाणे होते. हाक्के याच्या घरातील महिला या दिलीप यांना ओळखत होत्या. त्या त्यांना भावोजी म्हणत होत्या. घरी आल्यावर दिलीप ही त्यांना वहिनी म्हणूनच हाका मारत होता. त्यातच हाक्के कुंटूंबातील कल्पना (काल्पनिक नांव) हिच्या बरोबर दिलीप याची नजरा नजर होत होती. तो तिला वहिनी म्हणून बोलवत असताना तिला नजरेचे इशारे करीत होता. दिलीप हा अविवाहित होता हे कल्पनाला माहित होते. तिने ही त्याच्या मनातील ओळखले असल्याने ती ही दिलीप आला की त्याच्याशी लाडीक चाळा करीत त्याच्याशी गप्पा मारत बोलत होती. त्यातून त्या दोघांचे विवाहबाहय संबंध जुळले होते. त्या दोघाच्या त्या संबंधाची सुरूवातीला कुणाला काही संशय नव्हता.की कुणाला काही थांगपत्ता नव्हता. त्यामुळे त्या दोघांचे फावत होते. ते दोघे ही शरीरसुख घेत असताना दोघांनी ही पुढची पायरी ओलांडली होती. कल्पनाला तर त्या कामासाठी आता दिलीप पाहिजे होता. त्यामुळे ती नवऱ्याचा दुस्वास करीत होती.घरात कोणत्या ना कोणत्या कारणातून नवऱ्याबरोबर भांडण काढत होती. तिच्या नवऱ्याला तिच्या वागण्याचे काही कळत नव्हते. अलिकडे आपली पत्नी आपल्याबरोबर अशी का वागते याचे त्याला कोडे पडले होते. त्यातच ती तासन तास आपल्या मोबाईलवरून कुणाशी तरी बोलत असते, घरात कुणी नसते त्यावेळी ती बाहेर कुणाला तरी भेटायला जाते याची कुणकुण त्याला लागली होती.त्यामुळे तो तिच्यावर संशय घेत होता. तिचे बाहेर कुठल्यातरी परपुरूषाबरोबर संबंध असल्याची त्याला खात्री झाली होती. कल्पना ही चंचल आणि स्वैर वागत आहे याची त्याला खात्री पटल्यावर त्याने तिच्यावर पाळत ठेवले होते. ती आपल्या माघारी कुणाबरोबर बोलते, कुठे जाते याची तो माहिती काढत असताना त्याला समजले की घरात येणाऱ्या दिलीप वाघे याच्याबरोबर त्याच्या पत्नीचे शारीरिक संबंध असून त्यादोघांचे ही संबंध फार पुढे गेले आहेत. त्यामुळे तो आता दिलीपवर चिडून होता. त्याने ही गोष्ट आपल्या कुंटूबातील इतर लोकाना सांगितली. त्याचप्रमाणे कल्पनाला ही समजावून सांगून दिलीपबरोबर तिचे असणारे संबंध तोडून टाकण्यास सांगितले पण कल्पना ही ऐकणाऱ्यातील नव्हती. तिला दिलीपची चटक लागलेली होती. ती एकवेळ त्या संबंधातून नवऱ्याला सोडेल पण दिलीप याला सोडणार नाही असे तिने घरातील कुंटूबातील लोकांना ठणकावून सांगितले होते. पाणी आता डोक्यावरून जात आहे हे दिसताच कल्पनाच्या नवऱ्याने तिला काही दिवसासाठी तिच्या माहेरी पाठवून दिले. आणि इकडे दिलीप याला बोलावून त्याला त्याच्या संबंधाबद्दल समज दिली. त्याने जर कल्पनाचा नाद सोडला नाही तर त्याला जीवे मारण्याची धमकी दिली.पण दिलीप हा तयारीचा असल्याने त्याने त्याच्या धमकीला न जुमनता मी तुम्हाला दिलेले पैसे अगोदर परत दया मग नंतर मला बोला.असे सरळ सांगून हाक्के कुंटूबाला मार्गाला लावले होते. त्यातच घटनेच्या काही दिवस अगोदर कल्पना ही माहेरी गेली असताना ती नवऱ्याच्या माघारी दिलीप याला येवून भेटली होती. त्यावेळी त्या दोघांचे शरीरसंबंध होत असताना हाक्के कुटुंबातील एकाने त्या दोघांना रंगेहात पकडले होते. त्यामुळे हा वाद आणखीनच चिघळला होता. काही झाले तरी दिलीप याला आता कायमची अद्दल घडविली पाहिजे तरच बरे होईल असे हाक्के कुटुंबातील यशवंत हाक्के आणि नवनाथ हाक्के यानी ठरविले होते. दिलीपला अद्दल घडवायची तर प्लॅन केलाच पाहिजे असे ठरवून त्यांनी दिलीप याला संपविण्याचा पध्दतशीर प्लॅन केला.कारण दिलीपमुळे हाक्के कुंटूबाची गावात इज्जत अब्रु गेली होती. त्याला संपविले तर कल्पना काही करणार नाही याची त्याना खात्री होती. म्हणून दिलीप याला मारण्यासाठी ते संधीची वाट पाहत होते. ती संधी त्यांना गुरूवार दि.१२ ऑगस्ट २०२१ रोजी रात्रीच्या वेळी मिळाली.दिलीप याला यशवंत हाक्के आणि नवनाथ हाक्के यांनी दारू पिण्यासाठी म्हणून आणि त्याचेकडून घेतलेले रक्कम परत देतो असे म्हणून दरीबडची-सिध्दनाथ रस्त्यावरील वनक्षेत्रातील एका निर्जन स्थळी बोलावून घेतले. आपले पैसे परत मिळणार म्हणून दिलीप हा आपली मोटारसायकल घेऊन तेथे गेला.तो तेथे येण्याअगोदर नवनाथ आणि यशवंत हाक्के यांनी झाडाच्या आडोशला काठी आणि पाईप लपवून ठेवले होते. दिलीप आल्यावर त्या दोघांनी त्याला दारू पिण्यासाठी आग्रह धरला परंतू दिलीप याने दारूला मी हात लावत नाही म्हणत दारू प्यायला नकार दिल्यावर नवनाथने त्याला डिवचून दारूला हात लावत नाही पण बाईच्या अंगाला हात बरोबर लावतो असे म्हणत दिलीप याची गंचाडी पकडून त्याला त्याच्या मोटारसायकलीवरून खाली पाडले. दिलीप ही सावध होता. तो खाली पडून उठत असताना यशवंत याने झाडाच्या आडोशाला ठेवलले पाईप व काठी घेऊन आला. काठी त्याने नवनाथच्या हातात देवून सोडू नको त्याला आमच्या घरातील बाईला नादाला लावतो काय? म्हणत त्याला त्या दोघांनी लोंखडी पाईपने आणि काठीने जबर मारहाण करायला सुरूवात केली. त्यांनी त्याच्या अंगावर पायावर काठीने मारहाण करून शेवटचा एकच घात त्यांनी त्याच्या डोक्यात घातला. त्यासरशी त्याच्या डोक्यातून रक्ताची धार निघाली. मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने जागीच दिलीप वाघे याचा मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात येताच त्यांनी त्याचामृतदेह ओढत नेवून वनक्षेत्राच्या रस्त्याच्या कडेला नेवून टाकला आणि त्याच्या अंगावर त्याची मोटारसायकल टाकून दिली. जेणेकरून त्याची गाडी स्लिप होऊन त्याचा अपघात झाला व त्यात त्याचा मृत्यू झाल्याचा त्यांनी देखावा निर्माण केला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळावरून पलायन केले. दुसऱ्या दिवशी ही घटना उघडकीस आल्यावर घटनास्थळी जत पोलीस स्टेशनचे पोलीस तातडीने दाखल झाले. पोलीस उपाधीक्षक रत्नाकर नवले, पोलीस निरीक्षक अप्पासाहेब कोळी, स.पो .नी गोपाळ भोसले, स.पो.नी महेश मोहिते यांनी भेट देवून घटनेची पाहणी करून मयताचा व घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जत येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. डॉक्टरांनी मृतदेहाचा व्हिसेरा राखून ठेवला होता. तो उशिरा पोलीसांना मिळाला. त्यात मयताच्या डोक्याला जबर मारहाण झाल्याने त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्रावाने मृत्यू अशी नोंद होती. मयत दिलीप वाघे याचा खून झाल्यचो स्पष्ट होताच पोलीसांनी तपासाची चक्रे गतीमान करीत तपासाला सुरूवात केली. मयत दिलीप वाघे याचे हाक्के कुंटूबातील एका महिलेशी विवाहबाहय संबंध असल्याची माहिती मिळाल्याने पोलीसांनी त्या दिशेने तपासाला सुरूवात केल्यावर संशयावरून व मोबाईल कॉलच्या डिटेल्सवरून पोलीसांनी संशयावरून या घटनेतील यशवंत हाक्के व नवनाथ हाक्के यांना ताब्यात घेऊन त्याचेकडे या मयत दिलीप वाघे याच्या खूनाविषयी चौकशी केली असता त्या दोघांनी ही आपल्या कानावर हात ठेवला. परंतू पोलीसांचा संशय त्याच्यावर असल्याने पोलीसांनी त्याना आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि केला याची माहिती पोलीसांना दिली.

# प्रलंबित मागण्यांसाठी मनसेचं आमरण उपोषण




**अंबरनाथ/किरण तेलगोटे**

महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेनेने कामगारांच्या विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केलंय. कोरोनाच्या संकटात जीवाची पर्वा न करता काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अंबरनाथ नगर परिषदेने वाऱ्यावर सोडल्याने कर्मचाऱ्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी मसनेने हे उपोषणाचे हत्यार उपसले आहे. यापूर्वी अंबरनाथ नगरपरिषद प्रशासन व युनियनच्या पदाधिकार्यासोबत झालेल्या बैठकि दरम्यान प्रशासनाने कामगारांच्या मागण्या निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे होणारे ठिय्या आंदोलन प्रशासनावर विश्वास ठेवून स्थगित केलेले होते. परंतु आता प्रशासनाने लेखी दिलेले आश्वासन निर्धारित वेळेत पूर्ण न केल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र प्रकारचा असंतोष पसरलेला आहे. यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेनेनं अंबरनाथ मध्ये विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू केले आहे. सातव्या वेतनाच्या फरकाचा पहिला हप्ता आणि दुसरा हप्ता कर्मचार्याच्या भविष्य निर्वाह निधीत व्याजासह तत्काळ जमा करण्यात यावा. कोविड काळात कर्मचाऱ्यांना शासकीय नियमाप्रमाणे मिळणारे कोविड भत्याची पूर्ण रक्कम त्वरित जमा करण्यात यावी.अकाली निधन पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर त्वरित कामावर रुजू करून घ्यावे. स्वच्छता निरीक्षक विलास भोपी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी. सुर्यकांत जयराम अनार्थे अध्यक्ष अंबरनाथ युनिट संगीता मोहन चेंदवणकर अध्यक्षा बदलापूर युनिट. मनोज महादेव शेलार अध्यक्ष उल्हासनगर शहर. गौरव विजयसिंग राजपूत सह सचिव-मनसे अंबरनाथ शहर आमरण उपोषणास बसले आहेत.

# कोर्सेगाव येथे जीपसह विदेशी दारू जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील कोर्सेगाव गावाजवळ एक महिंद्रा स्कॉर्पिओ जीप व अवैध गोवा राज्य निर्मित विदेशी दारू असा पावणे सहा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क सोलापूर विभागाने केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने कोर्सेगाव येथे बरूर जाणाऱ्या रस्त्यावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर साडेचार लाखांची महिंद्रा स्कॉर्पिओ पांढऱ्या रंगाचे (एमएच १ डीए १३८८) अंदाजे किंमत ४, ५०,०००/- आहे व गोवा राज्य निर्मित मॅकडॉल नं १ व्हिस्कीच्या १८० मिलीच्या एकूण ७२० सीलबंद, १ लाख १५ हजारांच्या बाटल्याची पंधरा बॉक्स मिळाले व ओप्पो कंपनीचा मोबाईल अंदाजे किंमत ९५००/-असे एकूण ५, ७४, ७००/- रुपयांची मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई पुणे विभागाचे उपायुक्त प्रसाद सुर्वे , सोलापूर चे अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक अंकुश अवताडे, गजानन होळकर, जवान अण्णा करचे, किशोर लुंगसे, अनिल पांढरे यांच्या पथकाने केली आहे.

# डेंग्यू संदर्भात महापौर व उपमहपौरांनी घेतली आढावा बैठक

**लातूर/प्रतिनिध**



महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी डेंग्यू साथीच्या पार्श्र्वभूमीवर पालिका मुख्यालयात आढावा बैठक घेवून डेंगु निर्मुलनासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रभावी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. शहरातील रुग्णालयांशी समन्वय साधून डेंग्यूसदृश रुग्णांची माहिती संकलित करण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. पावसाळ्यामध्ये साथीचे विविध आजार डोके वर काढतात. लातूर शहरात मागील काही दिवसात डेंग्यूचे रुग्ण आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी ही बैठक बोलावली होती. उपमहापौर चंद्रकांत बिराजदार व आयुक्त अमन मित्तल यांचीही या बैठकीस उपस्थिती होती. डेंग्यू संदर्भातील सद्यस्थितीची माहिती महापौरांनी यावेळी घेतली. डेंग्यूचे रुग्ण वाढू नयेत यासाठी महानगरपालिकेच्या वतीने केल्या जाणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना संदर्भात अधिकाऱ्यांना त्यांनी विविध निर्देशही दिले. डेंग्यूचे रुग्ण वाढू नयेत यासाठी शहरात धूर फवारणी व औषध फवारणी करावी. प्रत्येक घरामध्ये फवारणी करून घ्यावी, असे ते म्हणाले. पालिकेच्या वतीने प्रतिबंधात्मक उपाय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली पाहिजे. आरोग्य व स्वच्छता विभागाची भूमिका या काळात अत्यंत महत्त्वाची आहे. पावसाळ्याच्या दिवसात पाणी साठून राहू नये. खुल्या जागामध्ये गवत वाढून डासांचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी स्वच्छता विभागाने दक्ष रहावे. डेंग्यूसदृश रुग्ण आढळला तर आरोग्य विभागाने तात्काळ उपचारास प्रारंभ करावा. संशयित रुग्णांच्या तपासण्या केल्या जाव्यात. रक्ताचे नमुने घेऊन डेंग्यूसदृश रुग्णास उपचारासाठी दाखल करून घ्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले. शहरातील अनेक रुग्ण खासगी रुग्णालयातून उपचार घेत आहेत. संबंधित रुग्णालयांशी समन्वय साधून डेंग्यूसदृश रुग्णांची माहिती संकलित करावी,असे निर्देशही महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी या बैठकीत दिले. मनपा मुख्यालयात झालेल्या या बैठकीस नगरसेवक, आरोग्य व स्वच्छता विभागाचे अधिकारी आणि कर्मचार्यांचीही उपस्थिती होती.

# डिझेल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला मुद्देमालासह अटक

**लातूर/करकरे अंबादास**

पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, पोलीस उपाधीक्षक प्रिया पाटील यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गजानन भातलवंडे यांचे नेतृत्वात जिल्ह्यात घडलेले मालाविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सूचना व मार्गदर्शन करण्यात आले होते. काही दिवसापूर्वी रेनापुर येथील एका पेट्रोल पंपावर डिझेल चोरीचा प्रकार घडला होता. त्यावरून पोलीस ठाणे रेणापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलीस अधीक्षकांचे आदेशान्वये गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अंमलदार करीत होते. दरम्यान सदर तपास पथकाला माहिती मिळाली की, रेणापूर येथील डिझेल चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी मुरुड येथे ट्रकमध्ये बसून येणार आहेत. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर तपास पथकाने सबस्टेशन मुरुड येथे सापळा लावला. सदर ट्रकला हात करून थांबून ट्रक चालकास विश्वासात घेऊन त्याच्याकडे नमूद गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने आपले नाव राजेंद्र काळे, वय २१ वर्ष, राहणार-आंदोरा तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद ह.मु. कनेरवाडी, तालुका कळंब जिल्ह उस्मानाबाद असल्याचे सांगितले तसेच रेनापुर येथील डिझेल चोरीच्या गुन्ह्यांमध्ये सध्या त्याच्या ताब्यातील ट्रक व अजून एक ट्रक वापरून इतर साथीदाराच्या मदतीने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले.त्या गुन्ह्यात चोरलेले डिझेल याच ट्रक मध्ये पाठीमागे प्लास्टिकच्या कॅन मध्ये भरून ठेवलेले आहे असे सांगितले. त्यावरून सदर आरोपीस नमूद गुन्ह्यात अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेला ट्रक व ३८५ लिटर डिझेल असा एकूण १० लाख ३६ हजार ९६० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी (ग्रह) प्रिया पाटील यांचे मार्गदर्शनात व पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांचे नेतृत्वात सपोनि सुधीर सूर्यवंशी पोलीस अंमलदार राजेंद्र टेकाळे,अंगद कोतवाड,राम गवारे, प्रकाश भोसले, रामहरी भोसले,राजू मस्के,नवनाथ हसबे,नितीन कठारे,चालक पोलीस अमलदार प्रदीप चोपणे यांचा सहभाग होता.

# हिंगोली येथील चालकाचा खून; मृतदेह औंश्यात सापडला

**औसा/शिवाजी मोरे**



औसा तालुक्यातील चलबुर्गा शिवारात एका शेतकऱ्यांच्या शेतातील ऊसामध्ये एक ३५ वर्षीय इसमाचा सडलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने औसा तालुक्यातील ग्रामीण भागात भितीचे वातवरण निमार्ण झाले असून गावकऱ्यात एकच खळबळ उडाली आहे. मयत व्यक्तीची किल्लारी पोलिसांनी ओळख पटविली असून सदरील मयत इसम हिंगोली जिल्ह्यातील आसल्याची माहीती समोर आली आहे.

१८ आगस्ट २०२१ रोजी औसा तालुक्यातील चलबुर्गा शिवारातील सर्वे नंबर ११३ मधील चंदर जाधव यांच्या शेतातील ऊसामध्ये कुजलेल्या अवस्थेत एक पुरूष जातीचा मृतदेह आढळून आल्याची माहीती किल्लारी पोलिसांना मिळाली. मिळालेल्या माहीती वरून किल्लारी पोलिसांनी चलबुर्गा गाव शिवारातील घटनास्थळी भेट देवून घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली.सदर मयत इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे नाव महमद नूर औरंगपुरेकर (वय ३५ रा. हिंगोली) आसल्याचे कळाले. दरम्यान सदरील इसमाचा दिनांक १२ आगस्ट २०२१ रोजी खुन करुन औसा तालुक्यातील चलबुर्गा शिवारातील ऊसामध्ये आनून टाकलेला असून मयत झालेला व्यक्ती महमद नुर हा ड्रायव्हर असल्याची माहिती आहे. याबाबत किल्लारी पोलिसांना विचारले असता सदरील इसम हा रा. हिंगोली येथील असून अधिक माहिती हिंगोली पोलिसाकडे आहे आमचेकडे अधिक माहिती नसल्याचे किल्लारी पोलिस ठाण्याचे चलबुर्गा बिट अमलदार सचिन उस्तुरे यांनी सांगितले.

# वांगी परिसरात जुगार अड्ड्यावर धाड; साडेपंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत वांगी शिवारातील शेगावकर यांच्या शेतामध्ये मन्ना नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती खबरीमार्फत मिळताच मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. नितीन थेटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करून सुमारे साडेपंधरा लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुरुवारी सायंकाळी वांगी शिवारातील शेगावकर यांच्या शेतामध्ये लिंबाच्या झाडाखाली काहीजणांनी मन्ना नावाच्या जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मंद्रूप पोलिसांनी सापळा रचून सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगूवाले, बीट अंमलदार अविनाश पाटील, पोलीस कॉन्स्टेबल शंकर पाटील, पोलीस नाईक सागर मठपती, पोलीस कॉन्स्टेबल चंद्रकांत सुतार यांच्या टीमने धाड टाकून यातील चारचाकी आणि दुचाकी वाहनांसह १५ लाख ६५ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये तिरुपती भरले (वय ३५ रा. मजरेवाडी सोलापूर) चंद्रशेखर वटारे (वय ४६ रा. गजानन नगर सोलापूर), कमलेश्वर नीळ (वय ४७ रा.



राघवेंद्र नगर सोलापूर) जावेद देवणी (वय ४८ रा. मुलतानी बेकरी समोर सोलापूर) त्या चार आरोपींविरुद्ध मंद्रूप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आह पुढील तपास पोलीस नाईक अविनाश पाटील करीत आहेत. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सूर्यकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगुवाले व त्यांच्या टीम नी कारवाई केली आहे, या कारवाई बद्दल मंद्रूप पोलिसांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# बिनटाक्याची हृदयशस्त्रक्रिया करण्यात विवेकानंद रुग्णालयातील डॉक्टरांना यश

**लातूर/प्रतिनिधी**



बालकाच्या हृदयाला असणारे छिद्र बंद करण्यासाठी विवेकानंद रुग्णालयातील डॉक्टरांनी कसलीही चिरफाड न करता शस्त्रक्रिया केली. विशेष म्हणजे शस्त्रक्रियेसाठी हृदय बंद न करता चालू स्थितीतच शस्त्रक्रिया करून दुसऱ्याच दिवशी रुग्णाला रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली. लातुरात प्रथमच अशा पद्धतीची शस्त्रक्रिया पार पडली.एखाद्या बालकाच्या हृदयाला जन्मतः छिद्र असेल तर त्यासाठी हर्ट ओपन करावे लागते. मोठ्या प्रमाणात चिरफाड करावी लागते. ही शस्त्रक्रिया खर्चिक असते. या नव्या तंत्रज्ञानाने चिरफाड करण्याची गरज भासत नाही. एकही टाका न घालता रक्तवाहिन्यांच्या माध्यमातून ही शस्त्रक्रिया केली जाते. आतापर्यंत पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरात ही शस्त्रक्रिया केली जात होती. लातुरात वयस्कर व्यक्तींच्या काही शस्त्रक्रिया अशा पद्धतीने पूर्वी केल्या गेली आहेत परंतु तीन वर्षांपर्यंतच्या बालकाची अशी शस्त्रक्रिया लातुरात प्रथमच झाली. एएसडी अर्थात एट्रियल सेप्ट्रल डिफेक्ट म्हणजे हृदयातील एक प्रकारचे छिद्र आणि ए एस डी डिव्हास क्लोजर म्हणजे हे छिद्र चिरफाड न करता बंद करण्याची शस्त्रक्रिया. चाकूर तालुक्यातील एका तीन वर्ष वयाच्या बालकाच्या हृदयाला छिद्र होते. या माध्यमातून ते बंद करण्यात आले. नेहमीच्या पद्धतीने ही शस्त्रक्रिया केली असती तर रुग्णाला जवळपास एक आठवडा रुग्णालयात रहावे लागले असते. शिवाय मोठ्या प्रमाणात खर्चही आला असता. महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून विवेकानंद रुग्णालयाने ही शस्त्रक्रिया मोफत केली. बाल ऱ्हदयरोग तज्ञ डॉ. नितीन येळीकर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी ही शस्त्रक्रिया पार पाडली. जवळपास पाऊण तास चाललेल्या या शस्त्रक्रियेसाठी डॉ.मंगलेश निंबाळकर, डॉ.शिवाजी माळी, डॉ.धनंजय माळणकर, डॉ.औरंगाबादकर, नेताजी भोईबार, दत्ता पळसे, विष्णू पंडगे, सोमनाथ कोकणे, शंकर जाधव यांच्यासह रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. हृदयाला छिद्र असल्यानंतर बाळाला श्वास घेण्यास त्रास होतो, वजन वाढत नाही. याशिवाय न्युमोनिया सारखे आजार डोके वर काढतात. दोन वर्ष वयानंतर या हृदयविकारावर शस्त्रक्रिया केली जाते. अशा बालकाच्या हृदयाचे ठोके वेगळ्या पद्धतीने डॉक्टरांना तपासणी दरम्यान ऐकू येतात. त्यातून संशय आला तर रोग निदानासाठी हृदयाची सोनोग्राफी (२ डी इको) केली जाते, अशी माहिती डॉ.नितीन येळीकर यांनी दिली. पुढील काही दिवसात विवेकानंद रुग्णालयात बालकांच्या ऱ्हदया संदर्भातील सर्व शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे काका, डॉ.अरुणा देवधर, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. राधेश्यराम कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनामुळेच ही शस्त्रक्रिया यशस्वी होऊ शकली, असेही ते म्हणाले.

**पान ४ वरून....**

## पालघरमध्ये नविन प्रशासकीय इमारतीचे ...

असल्याने जिल्हा प्रशासनाच्या या कार्यतत्परतेमुळे जिवीत हानी टाळता आली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवाच्या काळात नविन इमारतीचे लोकार्पण होत आहे. ही बाब अभिमानास्पद असून नविन इमारतीत येणाऱ्या नागरीकांचे काम तात्काळ होतील अशी दृढ इच्छा आपण मनामध्ये बाळगली तर ही भव्य सुसज्ज इमारत देशामध्ये आगळी वेगळी ओळख निर्माण करेल असा विश्वासही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले की नविन वास्तुमध्ये काम करताना नागरिकांच्या गरजांकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे. नविन वास्तू जनतेच्या सेवेसाठी असल्याने अधिकारी व नागरिकांमधील बांधिलकी टिकणे महत्त्वाचे आहे. जव्हार येथिल राजवाड्याच्या कलाकृतीवरून सिडकोने निर्माण केलेल्या जिल्हा प्रशासनाची कलात्मक स्थापत्याचा अनोखा अविष्कार असलेली अशी भव्य वास्तू साकारण्यात आली आहे. अशी शासकीय कार्यालयाची वास्तू संपूर्ण देशात नाही. या वास्तूमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सर्व समाज घटकांना समान न्याय देऊन जिल्ह्याचा विकास साधावा. या वास्तूमुळे जिल्ह्याच्या विकासांना चालना मिळेल असा विश्वासही श्री. पवार यांनी व्यक्त केला. कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री दादाजी भुसे यांनी यावेळी सांगितले की छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या जिल्ह्यामध्ये नविन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन सोहळ्याने विकासाच्या नविन पर्वाला सुरूवात झाली आहे. प्रशासकीय इमारतींमध्ये साधारणत: ६० जिल्हास्तरीय कार्यालये स्थापीत होणार आहेत. आज रोजी पालघर जिल्ह्यामध्ये एकूण ४१ शासकीय कार्यालये स्थापन झाली असून, उर्वरित २३ विभागांची कार्यालये लवकर स्थापन होणे आवश्यक आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आदिवासी विकास भवन, महिलांसाठी 'One Stop Centre' यांचेकरीता जागा उपलब्ध करून देवून सदरहू इमारतींचे बांधकाम येत्या २ वर्षामध्ये पूर्णकरण्याचा मानस असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. याचबरोबर मौजे टेंभोडे येथे राज्य उत्पादन शुल्क विभागास २ एकर जागा देण्यात आली आहे. मौजे सरावली येथे सुसज्य ग्रामीण रूग्णालय बांधण्याकरीता १.५ एक्कर जागा प्रदान करण्यात आली आहे. JSW कंपनी CSR निधीमधून यासाठी २५ कोटी निधी उपलब्ध करून देणार आहे. मौजे उमरोळी येथे जिल्हाकारागृहासाठी २५ एकर जागा, ग्रामीण विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्रास (RSETI) २ एकर जागा तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयास ५ हेक्टर (१२.५० एक्कर) जागा प्रदान करण्यात आली आहे. जिल्ह्यामध्ये स्त्री रुग्णालय स्थापन होण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात ५ एक्कर जागा उपलब्ध करून देण्यात येत आहे. स्थानिक खेडाळूंना प्रोत्साहन मिळावे यासाठी मौजे टेंभोडे येथे १६ एक्कर जागेमध्ये राष्ट्रीय दर्जाचे जिल्हा क्रिडासंकुल विकसित करण्यात येत आहे. मौजे अल्याळी येथे ४ एक्कर जागा क्रिडांगणाकरीता पालघर नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आली आहे. मौजे अल्याळी, नवली, टेंभोडे येथील तलाव व पालघर शहरातील गणेश कुंड बगीचा क्षेत्र विकास करण्यासाठी पालघर नगरपरिषदेच्या ताब्यात देण्यात आली आहे. तौक्ते चक्रिवादळामुळे झालेल्या अतिवृष्टीमुळे पालघर जिल्ह्यात ३ व्यक्ती मृत्यू व ४ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. १४ हजार ३५० शेतकऱ्यांचे ६ हजार १०० हेक्टर क्षेत्रावर शेती पिके/ फळपिकांचे नुकसान झालेले आहे. ९५ घरांचे पूर्णत: तर १४ हजार ३१२ घरांचे अशंत: पडझड होऊन नुकसान झालेले आहे. तसेच ५३ बोटींचे नुकसान झाले असून, सदर नुकसानीसाठी शासनाकडून विशेष दराने मदत जाहिरकरून जिल्ह्याला ५१ कोटी ५१ लाख इतके अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभारही पालकमंत्री दादाजी भूसे यांनी यावेळी व्यक्त केले.

## अक्कलकोट येथे साहित्यरत्न अण्णा ...

कसबे यांनी केले. रक्तदान सारखे कार्यक्रम घेऊन आदर्श उपक्रम राबवणे गरजेचे आहे असे लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांनी मातंग समाज मार्गदर्शन करताना संबोधित केले यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव भोसले, रजनी भाऊ डोलारे, सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुधाकर पाटोळे, उस्मानाबाद जिल्हाध्यक्ष शिवाजी भाऊ गायकवाड, जिल्हा युवक अध्यक्ष सागर भाऊ लोखंडे, माजी नगरसेविका पुतळाबाई शिरसागर यावेळी बंडू गवळी नगरसेवक विकास मोरे, अजय गायकवाड, शिवाजी धसाडे अश्विनी रक्तपेढी कुंभारी प्रमुख बिरादार युवक शहराध्यक्ष श्रीपाद खवळे सर्व समाज बांधव व सर्व मान्यवर उपस्थित होते हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल गवळी, नामदेव क्षीरसागर, रतन शितोळे, अनिल शितोळे, दिपक देडे लहुजी शक्ती सेना कोर कमिटी अध्यक्ष दगडू भाऊपारखे, राहुल क्षीरसागर, बाबाजी कांबळे, सुदर्शन कांबळे, नितीन हटकर, संतोष खवळे परिश्रम घेतले.

## नांदेड येथे मराठा समाजाचा भव्य...

भाषणात केले. आजच्या आंदोलनामध्ये जनप्रतिनिधीने बोलायचे होते पण ते शक्य न झाल्यामुळे मला बोलावे लागत आहे. आज पर्यंतच्या आरक्षण आंदोलनामध्ये ज्या मागण्या मराठा समाजाच्या आरक्षणासाठी करण्यात आल्या त्याला मान्यता मिळाली नाही .पण शासनाने पाठवलेल्या पत्राचा उल्लेख करून त्यातील विवेचन संभाजीराजे भोसले यांनी केले सरकारने पुणे-मुंबई लॉंग मार्च होणार नाही यासाठी काय करावे. हे सांगत असताना संभाजीराजे भोसले म्हणाले, आम्हाला पुढे काहीच आंदोलन करायचे नाही पण तशी वेळ आमच्यावर आणू नका आणि आमची ताकद दाखविण्याची गरज पडणार नाही असे काहीतरी करा असे आव्हान सरकारला केले. मराठा समाजाच्या मागण्या मान्य न केल्यास येत्या काळात मुंबई, दिल्ली येथे लॉंग मार्च काढावा लागेल असा इशारा संभाजी राजे यांनी दिला. यावेळी भाजपचे खा. प्रताप पाटील चिखलीकर, सेनेचे खासदार हेमंत पाटील, आ. राम पाटील रातोलीकार, आ. तुषार राठोड कॉंग्रेसचे आ. मोहन हंबर्डे, सेनेचे आ.बालाजी कल्याणकर, आ.शामसुंदर शिंदे, आ.माधवराव पाटील जवळगावकर यांची उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी राजे यांच्या पुतळ्यासमोर जवळपास जिल्हा परिषदेच्या इमारतीपर्यंत मराठा समाजातील लोकांना बसण्याची सोय करण्यात आली होती. पोलीस अधीक्षक प्रमोद कुमार शेवाळे यांच्या नेतृत्वात सकाळी सहा वाजल्यापासून विविध रस्त्यावरील वाहतूक वळती करून आंदोलकांना सहज रीतीने कार्यक्रम स्थळी जाता येईल याची सोय करण्यात आली होती. आंदोलनात येणाऱ्या कार्यकर्त्यासाठी मराठा समाजाने विविध रस्त्यावर फळांची सोय केली होती.

## आम्ही जिजाऊ, सावित्रीच्या लेकी ...

ग्रामसेविका शोभा भोजने, प्रगतशील शेतकरी मंगल वाघमारे, उद्योजिका प्रितम जाधव, उद्योजिका सुवर्णा जोशी, प्राचार्या डॉ. शामलिला बावगे, युवा खेळाडू सुरेखा गिरी, न्युट्रीशियन निता खेडकर, ड. रेणुका महाळंगीकर, सलग चोविस तास नृत्य करणारी सृष्टी जगताप, आदर्श सरपंच रेणूका हावगीराव तोडकरी आदी महिलांना सन्मानीत करण्यात आले.

## चिंचोटी माणकोली रस्त्याच्या दुरावस्थे ...

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुढे करत पोलिसांनी आंदोलन स्थगित करण्यासाठी पुढाकार घेतल्याने आंदोलकांनी दिड तास रोखून धरलेला रस्ता सुरळीत करण्यात आला. मात्र पूर्वनियोजित असलेल्या या आंदोलनाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबरच टोल वसूल करणाऱ्या सुप्रीम कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पाठ फिरविल्याने आंदोलकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व टोल प्रशासना विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत पोलोसांसमोर आपला राग व संताप व्यक्त केला.

## अनिसच्या अध्यक्षपदी डॉ.धिरज देशमुख...

यावेळी महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीच्या अध्यक्षपदी डॉ.धिरज देशमुख यांची निवड झाल्याने प्रकाश. घादगीने, वसंत टेंकाळे, रमेश माने, निशिकांत मिरकले यांनी डॉ. धिरज देशमुख यांना शुभेच्छा देवून त्यांचा सत्कार केला.

23 TO 29 AUGUST 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 21/08/2021 9:53 PM Page 1



## पालघरमध्ये नविन प्रशासकीय इमारतीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण

# विकास कामे करताना स्थानिक संस्कृती व परंपरांचे जतन करणे आवश्यक -मुख्यमंत्री






**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील आदिवासी संस्कृती व कला देशामध्ये प्रसिद्ध आहेत. वारली चित्रकला तर जागतिक स्तरावर पोहचली आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विकास कामे करताना आदिवासी संस्कृती व परंपरा यांचे जतन करून विकास कामे करावीत व नविन इमारतीचा नावलौकिक वाढवावा असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिले. नविन सुसज्ज जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या इमारतीचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले त्यावेळी मुख्यमंत्री श्री ठाकरे बोलत होते.

यावेळी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील (ऑनलाईन), महसुल मंत्री बाळासाहेब थोरात (ऑनलाईन), नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, महसुल व ग्रामविकास मंत्री अब्दूल सत्तार, पालघर जिल्हा परिषद अध्यक्षा वैदही वाढाण, खासदार राजेंद्र गावीत, सर्वश्री आमदार श्रीनिवास वनगा, सुनिल भुसारा, राजेश पाटील, विनोद निकोले, रविंद्र पाठक, मुख्य सचिव सिताराम कुंटे (ऑनलाईन), कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी, कोकण परिक्षेत्र उपमहानिरिक्षक संजय मोहिते, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास शिंदे, जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याला सागरी, नागरी आणि डोंगरी भौगोलिक भूभाग लाभला असल्याने नैसर्गिक आपत्तीचा धोका कायम असतो. तोक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्यामध्ये नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त भागाचा पंचनामाकरून नुकसानग्रस्ताना मदत वाटपाचे काम सुरू आहे. तसेच जिल्हा प्रशासनाने कोरोना काळात केलेल्या उपाययोजनांमुळे जिल्ह्यातील कोरोना रूग्णांची संख्या कमी झाली आहे. येणाऱ्या संभाव्य तिसऱ्या लाटेसाठी जिल्हा प्रशासनाने ऑक्सीजन प्रकल्प उभारला आहे. ऑक्सीजन बाबतीत जिल्हा स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. येणाऱ्या कोणत्याही नैसर्गिक संकटात तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले. पालघर जिल्ह्याच्या आदिवासी संस्कृतीला व परंपरेला चालना देण्याचे काम जिल्हा प्रशासनाने करावे जिल्ह्यामध्ये वनसंपदा आहे औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती आहेत. जिल्ह्यातील महत्त्वाचे फळ चिकु साता समुद्रापार गेले आहे. वारली चित्रकला हे सर्व परंपरेने लाभलेले महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व घटकांना गती देऊन जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण करावी. जिल्ह्यामध्ये औद्योगिकरण झाल्यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यातील उद्योग वाढावेत यासाठी उद्योजकांना विविध सवलती देऊन गुंतवणुक करण्यास उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे असेही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी सांगितले. जिल्हा प्रशासनामार्फत पालघर जिल्ह्यात एकूण १३ शिवभोजन केंद्र मंजूर असून त्यापैकी सद्यस्थितीत ९ शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. सदर शिवभोजन केंद्रातून सध्या प्रतिदिन ३ हजार थाळी मोफत शिवभोजन केंद्रावर लाभार्थ्यांना वाटप करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत आजपर्यंत ९ लाख १० हजार ७७१ थाळ्यांचा लाभ लाभार्थ्यांनी घेतलेला आहे. या योजनेस पालघर जिल्ह्यामध्ये मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पावसाची परिस्थिती असल्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाच्या माध्यमातून जिल्हा प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात तोक्ते चक्रीवादळा दरम्यान समुद्रात गेलेले मच्छिमार यांना परत समुद्र किनारी ...पान ३ वर

## मनसे कार्यकर्त्यांनी अखेर भिवंडी मालोडी टोलवसुली बंद न करणारा टोलनाका फोडला



**भिवंडी/प्रतिनिधी**

तालुक्यातील अंजुरफाटा खारबाव कामण चिंचोटी फाटा या दरम्यानच्या राज्यमार्गाची खड्डयांमुळे दुरावस्था झाली असून या विरोधात स्थानिकांसह विविध राजकीय पक्षांबकडून आंदोलने निवेदन देऊन ही या रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने नागरीक संतप्त असून त्यातून शुक्रवारी या रस्त्यावर चाल करून आलेल्या मनसे सैनिकांनी अखेर टोलवसुली बंद न ठेवणाऱ्या टोल नाक्यावर हल्ला करीत तोडफोड केली आहे. या रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती करावी ती जो पर्यंत होत नाही, तोपर्यत रस्त्यावरील टोल वसुली बंद ठेवावी अशी मागणी मनसे चे ठाणे पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी केली होती. त्यानुसार गुरुवारी या टोलनाक्यावर अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून टोल वसुली बंद केली होती.परंतु आंदोलकांची पाठ फिरल्या नंतर पुन्हा टोल वसुली सुरू केल्याने याची कुणकुण मनसे सैनिकांना लागताच शुक्रवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास या ठिकाणी आलेल्या मनसे कार्यकर्त्यांनी हातातील लाकडी दांडक्याने टोल वसूल करणाऱ्या कॅबिनीं ची तोडफोड करून पोबारा केला आहे. या घटनेने खळबळ उडाली असून तालुका पोलीस घटनास्थळी दाखल होऊन तोडफोड करणाऱ्या कार्यकर्त्यांची माहिती घेऊन त्या विरोधात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया करीत आहेत.

## अक्कलकोट येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान व विविध कार्यक्रम संपन्न





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सालाबादप्रमाणे यावर्षीही साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०१ व्या जयंती निमित्त अक्कलकोट माणिक पेठ येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रम चे संयोजक मातंग समाज अध्यक्ष तथा लहुजी शक्ति सेना जिल्हा कार्याध्यक्ष सुनिल (अण्णा) खवळे यांच्या संयोजनातून भव्य रक्तदान शिबीरात १०१ जणांनी रक्तदान केले तसेच गरजु महिलाना १०१ साडी वाटप व अन्नदान किट १०१ वाटप दिवसभरात कार्यक्रमासाठी येणाऱ्या बांधवासाठी भोजन व्यवस्था तसेच १०१ रक्तदात्याना अण्णा भाऊ साठे यांची प्रतिमा व घड्याळ देण्यात आले. या कार्यकर्माचे उदघाटन विरक्तमठचे बसवलिंग महास्वामी, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्ष अशपाक बळोरगी, बसवलिंग खेडगी यांच्याशुभ हस्ते उदघाटन करण्यात आले. तसेच या वेळी लहुजी शक्ति सेना संस्थापक विष्णू भाऊ कसबे यांनी रक्तदान केले व मातंग समाजातील समाज बांधवांनी डॉल्बी व इतर इतर कार्यक्रमास पैसा व वेळ वाया न घालवता या पेक्षा समाजात उपयोगी होईल असे उपक्रम व कार्यक्रम राबवणे गरजेचे आहे. करोना काळामध्ये सर्व समाज बांधवांचे बहिणीचे फार हाल झालेले आहे या काळामध्ये अनेक गोरगरीब चे जीवन उदध्वस्त झालंय काही रुग्ण रक्त अभावी मृत्यु मुखी पडले देशात कमी पलेल्या रक्त पुरवठा बाबत चिंता व्यक्त केली तरी आपण सर्व समाजातील बांधवांसाठी रक्तदान शिबिर कौतुकास्पद काम केल्याचे मनोगत माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी व्यक्त केले जयंती च्या माध्यमातून मदतीचा हात पुढे केलं पाहिजे कोरोना काळामध्ये अनेकांना रक्ताची गरज, अन्नधाण्याची गरज भागवण्याचा प्रयत्न संयोजक सुनील खवळे यांनी केल्याने त्यांचे कौतुक लहुजी शक्ति सेने चे संस्थापक विष्णुभाऊ ...पान ३ वर

## नांदेड येथे मराठा समाजाचा भव्य मूक मोर्चा



**नांदेड/नरेन भारती**

मराठा आरक्षणाच्या विषयावर नांदेडात शुक्रवारी सकल मराठा समाजाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर मूक आंदोलन करण्यात आले. आंदोलनाला मार्गदर्शन करताना संभाजी राजे म्हणाले की, यापूर्वी कोल्हापूर, नाशिक येथे आंदोलने झाली होती. त्यावेळी सर्वच पक्षाचे नेते उपस्थित होते. पण त्यावेळी मुख्यमंत्री यांनी पत्र पाठवावयास हवे होते पण पाठवले नाहे. मग ते अता का पाठवले. मी समाजासाठी राज्यभर मूक आंदोलन करण्याचे ठरविले असताना त्यात प्रत्येकाचा सहभाग अपेक्षितच केला होता, पण नांदेड चे पालकमंत्री अशोक चव्हाण हे आजच्या कार्यक्रमासाठी हजर राहिले नाहीत याचे दुःख व्यक्त करून युवराज छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी खंत व्यक्त केली. आंदोलनाच्या माध्यमातून हा मला कोठेही जायचे नाही तशी गरज आम्हाला शासनाने आणू नये असे छत्रपती संभाजी राजे यांनी सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा क्र मूक आंदोलन मार्गदर्शन केले. यामध्ये युवराज छत्रपती संभाजीराजे भोसले आले होते सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू राजे यांच्या प्रतिमेचे पूजन करून युवराज संभाजी राजे भोसले यांनी समाजबांधवासमोर बोलण्यास प्रारंभ केला.मराठा समाजाने आपल्या आरक्षण मागणीसाठी भरपूर आंदोलने केली, पण त्यात दिलेल्या शब्दांना सरकार फिरले. हे सांगताना त्यांनी राज्यसभेमध्ये मला समाजाविषयी बोलण्याची संधी मागितल्यावर सुद्धा दिली नाही म्हणून मी खासदारकी सोडायची तयारी केली. त्यावेळेस मला बोलण्याची संधी मिळाली होती. मराठा समाजाला आरक्षण देऊन त्यामागे लावलेले राजकारण आणि त्यातून आजपर्यंत निर्माण झालेले प्रश्ने त्यात त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यातील अनेक खाचखळगे संभाजीराजे यांनी मांडले. आरक्षण देताना राज्य सरकारची जबाबदारी आणि केंद्र सरकारची जबाबदारी याचे सविस्तर विवेचन त्यांनी आपल्या ...पान ३ वर

## आम्ही जिजाऊ, सावित्रीच्या लेकी विशेषांकाचे खा.सुधाकर श्रृंगारे यांच्या हस्ते प्रकाशन संपन्न



**लातूर/प्रतिनिधी**

महिलांनी उच्च शिखरे पादाक्रांत केले पाहिजे आज महिला कोणत्याही क्षेत्रात पुरुषापेक्षा कमी नाहीत. आज खऱ्या अर्थाने महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून किंबहुना एक पाऊल पुढेच आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, असे प्रतिपादन लातूरचे खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी केले. साप्ताहिक समृध्द व्यापार संपादित आम्ही जिजाऊ सावित्रीच्या लेकी या विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर साप्ताहिक समृध्द व्यापारचे मुख्य संपादक दत्तात्रय जी. परळकर, उपसंपादक, संतोष सोनवणे, पत्रकार संजय राजुळे, पत्रकार संग्राम वाघमारे, शिवलिंग जेवळे, वाडकर सर आदी मान्यवर उपस्थित होते. सदरील कार्यक्रमामधे कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शाल, सन्मानचिन्ह, गौरवपत्र व विशेषांक असे पुरस्काराचे स्वरुप होते. उद्योजीका उर्मिला बिराजदार, संचालिका प्रिती शहा, ब्युटीशियन रोहिणी बिराजदार, प्राचार्या डॉ. आशा मुंडे, सामाजिक कार्यकर्त्या मानिषा कोकणे, उद्योजिका शिला वाघमारे, ...पान ३ वर

## प्रजा सुराज्य पक्षातर्फे पाच सूत्री कार्यक्रम प्रकाशन सोहळा संपन्न




**वसई/प्रतिनिधी**

प्रजा सुराज्य पक्षातर्फे वसई मधील पापडी येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र जोडो या जनसंपर्क अभ्यानाअंतर्गत पाच सूत्री कार्यक्रमाचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी प्रजा सुराज्य पक्षाचे उपाध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष अब्दुल लतीफ शेख यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले कि पक्षातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तिकेत प्रामुख्याने आरोग्य, रोजगार, महिला धोरण, अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती जमाती, कामगार इत्यादी विषय असून त्या अनुषंगाने सार्वजन हिताय सार्वजन सुखाय हि संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकारी अथक मेहनत घेत आहेत. यावेळी प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे यांनी आपल्या भाषणात सांगितले कि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून द्विदलिय संसद कार्यपद्धती अवलंबल्यामुळे आज देशात विरोधी पक्षाला अनन्य साधारण महत्व आले आहे. विरोधी पक्षाच्या मार्फत सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेऊन सर्वसामान्य जनतेची कामे होणे अपेक्षित आहे. परंतु आज तसे होताना दिसत नाही.

सदर कार्यक्रमास प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे, उपाध्यक्ष अब्दुल लतीफ शेख, महासचिव शिवदास मोरे, प्रवक्ता मकसूद हक्कानी महाराष्ट्र प्रेशाध्यक्ष संजय पवार उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शमीम खान सदस्य कायदेविषयक सहायक व सल्ला फोरम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई जेष्ठ समाजसेवक व व्यावसायिक प्रशांत मच्योडो उपस्थित होते. पक्षाचे कोकण प्रांत अध्यक्ष अनंत वाघेला हे सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती पीएचडी केलेले अरुण घायवट व श्रीमती लीला सोनावणे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जेष्ठ साहित्यिक शिवाजीराव सोनावणे उपस्थित होते. वसई- विरार शहर महानगराचे अध्यक्ष आरिफ खान यांनी हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सुनिता शिरसाट, मीना तांडेल, साजिद आडोणी, दिलीप सकपाळ, परशुराम यादव, संजू तडवी, फिरदोस गाब्रानी, छोटेलाल गौड आदी कार्यकर्ते हजर होते. कोरोनाचे सर्व नियम पाळून कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## शिवसेनेचं डम्पिंग ग्राउंडसाठी आंदोलन



**उल्हासनगर/किरण तेलगोटे**

उल्हासनगर मधील अनधिकृत डम्पिंग ग्राउंड हटविण्यासाठी सत्ताधारी शिवसेनेला आंदोलन करण्याची वेळ आलीय.कचऱ्याच्या गाड्या अडवून आंदोलन केलंय. राज्यात शिवसेनेची तर महापालिकेत शिवसेनेची सत्ता असताना आंदोलन करण्याची वेळ शिवसेनेवर आल्याने शहरात चर्चांना उधाण आलंय. उल्हासनगर कॅम्प-५ येथील डम्पिंग ग्राउंड अनधिकृत आहे. याला हटवण्यासाठी यापूर्वी अनेक आंदोलने झाली. या डम्पिंग ग्राउंडमुळे स्थानिकांना मोठा नाहक त्रास सहन करावा लागला आहे. शिवसेनेनं कचऱ्याच्या गाड्या अडवून अनोखा आंदोलन केलंय.मात्र राज्यात व उल्हासनगर महापालिकेत शिवसेनेची सत्ता असतांना शिवसेनेवर आंदोलन करण्याची वेळ येत असल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. हे डम्पिंग ग्राउंड उसाटने येथे हटविण्यात आलं आहे. मात्र उसाटने येथिल स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. यामुळे डम्पिंगचा प्रश्न कधी सुटणार असा प्रश्न उपस्थित केला जातोय.

## चिंचोटी-माणकोली रस्त्याच्या दुरावस्थे विरोधात रस्ता रोको




**भिवंडी/आकाश गायकवाड**

मानकोली अंजुरफाटा ते चिंचोटी महामार्गाच्या झालेल्या दुरावस्थे विरोधात गाव विकास समितीच्या वतीने बुधवारी खारबाव, कालवार व कामण या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. महामार्गावरील सुमारे दहा ते बारा गावातील स्थानिक नागरिकांनी या आंदोलनात भाग घेतला होता. या रास्ता रोको आंदोलनामुळे खारबाव परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. वाहनांच्या सुमारे चार ते पाच किलोमीटर पर्यत लांब रांगा लागल्या होत्या. भिवंडीतील मानकोली अंजुरफाटा चिंचोटी या राज्य महामार्गाची सदृटीह्या प्रचंड दुरावस्था झाली असून सध्या हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. त्यामुळे मागील अनेक वर्षापासून या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना आपला जीव मुठीत धरूनच प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे या रस्त्याची जबाबदारी असलेल्या सुप्रीम कंपनीबरोबरच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांचे या रस्त्यावर पुरता दुर्लक्ष होत आहे. या रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेक अपघात होत असून अनेकांचा या महामार्गावरील खड्डयांमुळे जीव गेला आहे. सुप्रीम कंपनी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचा रस्त्याबाबत दुर्लक्षित धोरणामुळे स्थानिक गावकऱ्यांनी एकत्र येत सर्वपक्षीय गाव विकास संघर्ष समिती स्थापन केली असून या गव विकास समितीच्या वतीने बुधवारी सकाळी ११ वाजता चिंचोटी अंजूरफाटा ते माणकोली या महामार्गावर कामण, खारबाव, कालवार अशा तीन वेगवेगळ्या ठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. विशेष म्हणजे रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करा, जोपर्यंत रस्ता दुरुस्त होत नाही तोपर्यंत टोल नाका बंद करा, अपघात मृत्यू, जखमी व कायम स्वरूपी अपंगत्व आलेल्या नागरिकांना आर्थिक मदत करा. अशी मागणी यावेळी यावेळी आंदोलकांनी केली. खारबाव येथे प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याने ...पान ३ वर

## अनिसच्या अध्यक्षपदी डॉ.धिरज देशमुख यांची निवड




**अहमदपूर/प्रतिनधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या एका कार्यक्रमात अध्यक्षपदी डॉ. धिरज देशमुख यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक पोलिस निरीक्षक रामचंद्र केदार तर आगार प्रमुख शंकर सोनवणे, सहायक पोलिस निरीक्षक प्रतिभा ठाकूर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. शासकीय विश्रामगृहात राज्य कार्यकारी समिती सदस्य प्रकाश घादगीने, रमेश माने, वसंत टेंकाळे, निशिकांत मिरकले यांच्या उपस्थितीत नुतन कार्यकारीणी पदाधिकारी निवड करण्यात आली असून उर्वरित कार्यकारीणी पुढील प्रमाणे आहे. कार्याध्यक्ष -मेघराज गायकवाड, प्रधान सचिव-प्रा.रत्नाकर नळेगावकर, उपाध्यक्ष-चंद्रशेखर भालेराव, बुवाबाजी संघर्ष-दस्तगीर शेख, वैज्ञानिक जाणीव प्रकल्प-प्रा.उमाकांत चलवदे, कायदेविषयक सल्लागार ॲड एन.एन देमगुंडे. वर्तापत्र व प्रकाशन विभाग- भागवत येणगे, सांस्कृतिक विभाग-अजहर बागवान. गोपाल पटेल, मानसिक आरोग्य विभाग-डॉ जयप्रकाश केंद्रे, गणेश सुर्यवंशी, विविध उपक्रम विभाग-उद्धव इप्पर, गणेश कोदळे प्रशिक्षण विभाग - इम्रोज पटवेगर, रामराव केंद्रे सोशल मेडिया- शिवाजी गायकवाड, उदयकुमार गुंडीले, जात निर्मुलन व विवेकी जोडी विभाग- अभिनेता रूद्रा मुरकूटे, युवा व विवेक वाहिनी-संदिप गायकवाड, राहूल गायकवाड महिला विभाग डॉ भाग्यश्री यलमटे, पुजा गायकवाड, शुभांगी खेडकर, सुरेखा उप्परवाड, अंजली वाघंबर, यास्मिन ताबोळी, वैशाली कदम तर मार्गदर्शक म्हणून डॉ.चंद्रकांत उगीले, मोहीब कादरी, प्रा.गोविंद शेळके, डॉ प्राचार्य वसंत बिरादार, प्रशांत घाटोळ महेंद्र खडागळे, यांची निवड करण्यात आली आहे. या वेळी स्वातंत्र्य दिनाचे अमृत महोत्सवाचे औचित्य साधून येथील माजी सैनिक अशोक लांडगे व विठ्ठल शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. ...पान ३ वर